www.rajdand.com
सातारा, मंगळवार
09.01.2024
पृष्ठ : ४ । मुल्य : ४ । मार्गशीर्ष कृ.२७
rajdandlive
Reg.No.MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
स्थापना १९९९

### ... तोवर मराठी नाटक संपणार नाही: देवेंद्र फडणवीस



(पान ३ वर)

# बिल्किस बानो यांना सुप्रिम न्याय

## आरोपींची शिक्षा माफ करण्याचा निर्णय अखेर रद्द!

**नवी दिल्ली : सर्वोच्च न्यायालयाचा गुजरात सरकारला दणका; बिल्किस बानो सामुहिक बलात्कार प्रकरणातील ११ आरोपींची शिक्षा माफ करण्याचा निर्णय गुजरात सरकारनं घेतला होता. या निणर्यावर देशभरातून तीव्र प्रतिक्रिया उमटल्या होत्या. या निणर्यासंदर्भात बिल्किस बानो यांनी थेट सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली होती. अखेर बिल्किस बानो यांना न्याय मिळाला असून गुजरात सरकारनं या ११ आरोपींची शिक्षा माफ करण्याचा घेतलेला निर्णय सर्वोच्च न्यायालयानं रद्द ठरवला आहे. त्यामुळे गुजरात सरकारला हा मोठा दणका मानला जात आहे.**




२००२ च्या गुजरात दंगलींदरम्यान बिल्किस बानो यांच्यावर ११ आरोपींनी सामुहिक बलात्कार केल्याची घटना घडली होती. त्यापाठोपाठ त्यांच्या कुटुंबातील सात जणांची निर्घृण हत्याही करण्यात आली होती. त्यांच्यावर बलात्कार केल्याच्या प्रकरणात या ११ आरोपींना जन्मठेपेची शिक्षाही झाली. मात्र, गेल्या वषी यातील काही आरोपींची उवरीत शिक्षा माफ करून त्यांची तुरुंगातून सुटका करण्याचा निर्णय गुजरात सरकारनं घेतला. या निर्णयाविरोधात बिल्किस बानो यांनी सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली होती. आज या प्रकरणी न्यायालयाने आपला निकाल दिला आहे.

दरम्यान, शिक्षा कमी करण्याचा निणर्यामुळेच हे ११ आरोपी तुरुंगातून सुटले होते. आता तो निर्णयच सर्वोच्च न्यायालयाने रद्दबातल ठरवल्यामुळे या आरोपींना पुन्हा अटक केली जाणार का? यावरही सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिले.

दोषींच्या सुटकेनंतर त्यांचा स्वातंत्र्याचा अधिकार अबाधित राहाण्याची मागणी गैरलागू आहे. कारण समानतेच्या वातावरणातच स्वातंत्र्याच्या अधिकाराचा विचार होऊ शकतो. दोषींप्रमाणेच पीडितांच्याही अधिकारांचा न्यायालयाला विचार करणं क्रमप्राप्त आहे. समानतेशिवाय कायद्याचं राज्य अस्तित्वात येऊ शकत नाही. अशा प्रकारे गुन्ह्याच्या परिणामांपासून गुन्हेगारांना मोकळीक देणं समाजातील शांततेला चूड लावण्यासारखं होईल. त्यामुळे सर्व ११ गुन्हेगारांनी येत्या २ आठवड्यांत पुन्हा पोलिसांना शरण यावं. कायद्याचं राज्य राखलं गेलंच पाहिजेह्व, असे स्पष्ट आदेश न्यायालयाने आपल्या निकालात दिले आहेत.

गुन्हेगारांना पुन्हा शिक्षामाफीसाठी प्रयत्न करायचे असतील, तर त्यासाठी त्यांनी आधी शिक्षा भोगण्यासाठी तुरुंगात असणं गरजेचं आहह्व, असंही न्यायालयाने यावेळी नमूद केलं.

न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना व न्यायमूर्ती उज्जल भुयान यांच्या खंडपीठासमोर या याचिकेवर सुनावणी झाली. मे २०२२ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणातील एका आरोपीने दाखल केलेल्या याचिकेवरील सुनावणीदरम्यान शिक्षा कमी करण्यासंदर्भात गुजरात सरकारने निर्णय घ्यावा, असे निर्देश दिले होते. हा निकाल न्यायालयाने यावेळी अपुऱ्या पुराव्यांच्या आधारे दिल्याचं नमूद करत रद्द ठरवला.

**दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने या खटल्याचा निकाल देताना गुजरात सरकारला फटकारलं आहे. हा गुन्हा जरी गुजरातमध्ये घडला असला, तरी महाराष्ट्रात या प्रकरणी आरोपींवर खटला चालून त्यांना शिक्षा सुनावण्यात आली होती. त्यामुळे गुजरात सरकारला आरोपींची शिक्षा माफ करण्याचा निर्णय घेण्याचा अधिकारच नाही. त्यामुळे, या प्रकरणात निर्णय घेण्याचा अधिकार महाराष्ट्र सरकारच्या अखत्यारीत येतो. त्यामुळेच गुजरात सरकारनं या ११ आरोपींची शिक्षा माफ करण्याचा घेतलेला निर्णय रद्द ठरवला जातो, असं न्यायालयाने यावेळी नमूद केलं.**

गुजरात सरकारने २०२२ मध्ये बिल्किस बानो सामुहिक बलात्कार खटल्यातील सर्व ११ आरोपींची शिक्षा माफ करून त्यांची सुटका केली होती. या खटल्यात जन्मठेपेची शिक्षा झालेला एक आरोपी राधेश्याम शाह याला मुंबईच्या सीबीआय न्यायालयानं शिक्षा सुनावली होती. शिक्षेची १५ वर्षं पूर्ण केल्याचा हवाला देत त्यानं तुरुंगातून सुटकेची मागणी केली होती.

आरोपींना महाराष्ट्रातील न्यायालयानं शिक्षा सुनावली होती. त्यामुळे यासंदर्भात महाराष्ट्र सरकारनंच निर्णय घेणं योग्य ठरलं असतं. पण गुजरात सरकारने दोषींसोबत मिळून यासंदर्भात कारवाई केली. याच शक्यतेमुळे सर्वोच्च न्यायालयाने हा खटला गुजरातबाहेर दुसऱ्या राज्यात वर्ग केला. या संपूर्ण प्रकरणात गुजरात सरकारनं घेतलेले निर्णय म्हणजे सरळ सरळ अधिकारांचा गैरवापर आहे. या न्यायालयाने दिलेल्या निकालाचा कायद्याचं उल्लंघन करण्यासाठी वापर करण्याचं हे आदर्श उदाहरण आहेह्व, अशा शब्दांत न्यायालयाने गुजरात सरकारवर ताशेरे ओढले आहेत.

# शिवसेनेचे १६ आमदार अपात्र होणार ?

## आज होणार फैसला



**नवी दिल्ली :** महाराष्ट्रासह देशाचं लक्ष लागलेल्या शिवसेनेच्या बंडखोर आमदारांच्या अपात्रतेच्या याचिकेवर आजपासून अंतिम सुनावणी होणार आहे. सुप्रीम कोर्टाने विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना फटकारल्यानंतर आजपासून शिवसेनेच्या १६ बंडखोर आमदारांच्या अपात्रतेच्या याचिकेवर सुनावणी होणार आहे. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर हे सुनावणी घेणार असून दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर विधानसभा अध्यक्ष फायनल निर्णय देणार आहे. त्यामुळं शिवसेनेच्या बंडखोर आमदारांची धाकधूक वाढली आहे. राहुल नार्वेकर यांनी बंडखोर आमदारांना अपात्र केल्यास एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्रीपदावरून पायउतार होण्याची शक्यता आहे. त्यामुळं मुंबईसह दिल्लीत राजकीय हालचालींना वेग आल्याचं पाहायला मिळत आहे.

ज्यातील सत्तासंघर्षावर निकाल देताना सुप्रीम कोर्टाने शिवसेनेतील बंडखोर आमदारांच्या याचिकांवर निर्णय घेण्याचा अधिकार विधानसभा अध्यक्षांनाच असल्याचं म्हटलं होतं. याशिवाय रिझनेबल टाईममध्ये यावर निर्णय घेण्यात यावा, असंही सुप्रीम कोर्टाने सुनावणीवेळी म्हटलं होतं. त्यानंतर राहुल नार्वेकर यांनी शिवसेनेतील बंडखोर आमदारांना नोटीस जारी करत उत्तर मागितलं होतं. सुनावणीत चालढकलपणा होत असल्याचा आरोप करत ठाकरे गटाने सुप्रीम कोर्टात धाव घेतली होती. त्यानंतर सुप्रीम कोर्टाने एका आठवड्याच्या आत सुनावणी पूर्ण करत त्याचा रिपोर्ट सादर करण्याचे आदेश विधानसभा अध्यक्षांना दिले होते. त्यानंतर विधानसभा सचिवालयाकडून सोमवार पासून म्हणजेच आजपासून सुनावणीची प्रक्रिया सुरू करण्यात येणार असल्याचं स्पष्ट करण्यात आलं होतं. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी शिवसेनेच्या १६ आमदारांना अपात्र केल्यास राज्यातील शिंदे-फडणवीस सरकार कोसळण्याची शक्यता आहे. बंडखोर आमदारांच्या यादीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचंही नाव आहे. त्यामुळं शिंदे अपात्र झाल्यास महाराष्ट्राला नवा मुख्यमंत्री मिळणार आहे. त्यासाठी भाजपने तयारी सुरू केल्याचं वृत्त एका मराठी दैनिकाने दिलं आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, देवेंद्र फडणवीस, अजित पवार आणि राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नावावर भाजपकडून विचार सुरू असल्याची माहिती आहे. शिंदेंचं मुख्यमंत्रीपद गेल्यास यापैकी एका नेत्याच्या गळ्यात मुख्यमंत्रीपदाची माळ पडणार असल्याचा दावा करण्यात येत आहे.

# सलमान खानच्या फार्म हाऊसमध्ये घुसलेले दोघे जेरबंद

**मुंबई:** सिने अभिनेता सलमान खान यांच्या पनवेल येथील अपिर्ता फार्म हाऊसमध्ये अनाधिकाराने प्रवेश करणाऱ्या लोकांना सुरक्षा रक्षकांनी पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. त्यांच्यावर अतिक्रमणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फार्म हाऊसच्या डाव्या बाजूला असलेल्या एका झाडावर चढून दोघेजण फार्म हाऊस मध्ये प्रवेश करत असल्याचे पाहिल्यानंतर आतील सुरक्षा रक्षकांनी त्यांना अटकाव केला. आत येण्याचे कारण विचारले असता ते कोणतेही उत्तर देऊ



शकले नाहीत. सुरक्षा रक्षकांनी त्यांना पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले.

घरात वाद झाल्यामुळे घरातून निघून बाहेर पडलोआणि बॉलीवूड मधील स्टासर्नी पाहण्यासाठी मुंबईला आलो, असे या दोघांनी पोलिसांनी केलेल्या प्राथमिक चौकशीत सांगितले आहे. या दोघांची रवानगी पोलीस कोठडीत करण्यात आली आहे.

# दूध अनुदानाची घोषणा अद्याप हवेतच

## अनुदानाची फाईल अर्थ विभागाकडे पडून?

**रांजणी / रमेश जाधव**

राज्यातील सहकारी दूध संघांना दूध घालणाऱ्या उत्पादकांना गाईच्या दुधाला प्रति लिटर पाच रुपये अनुदानाची घोषणा पशुसंवर्धन व दुग्धविकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली होती. १ जानेवारी २०२४ पासून या निर्णयाची अंमलबजावणी अपेक्षित होती पण या अनुदानाची फाईल अर्थ विभागाकडे पडून असून याबाबत अर्थ विभाग किंवा मंत्रिमंडळाच्या निर्णयाशिवाय आदेश निघू शकणार नाही अशी माहिती समोर आली आहे .त्यामुळे ही घोषणा हवेतच विरल्याची दिसून येते .



गेले काही महिन्यांपासून राज्यात गाईच्या दूध दरात मोठी घसरण झाली आहे . वास्तविक सरकारकडून प्रति लिटर 34 रुपयाचा दर बंधनकारक करण्यात आला आहे . पण खाजगी आणि सहकारी संघाकडून सर्रास 26 ते २७ रुपयांचा दर मिळतो आहे . यापूर्वी विविध शेतकरी संघटनांनी सातत्याने आंदोलने करत दूध दाराचे या प्रश्नावर लक्ष वेधून घेतले . अलीकडेच झालेल्या हिवाळी अधिवेशनात हा मुद्दा विरोधी पक्षाकडून प्रभावीपणे मांडण्यात आला . त्यानंतर दूध उत्पादकांना दिलासा देण्यासाठी प्रति लिटर पाच रुपयांचे अनुदान दिले जाईल अशी घोषणा दुग्धविकास मंत्री विखे पाटील यांनी केली . पण केवळ सहकारी दूध संघालाच दूध घालणाऱ्या शेतकऱ्यांना हे अनुदान देण्याची अट त्यामध्ये घालण्यात आली .

राज्य सरकारच्या मार्फत संबंधित दूध अनुदानाबाबतचा आदेश निघाल्याचे विश्वसनीय रित्या समजते . मात्र अद्यापही त्यावर कारवाई झाली नसल्याचे दिसून येत आहे . राज्यात सध्या खाजगी संघांकडून रोज १ कोटी ६ लाख ५ हजार लिटर तर सहकारी संघांकडून ४३ लाख ६९ हजार लिटर दूध संकलन होते . विशेष म्हणजे राज्यातील ७० ते ८० टक्के दूध खाजगी दूध संघांना दिले जाते तर उर्वरित २० ते ३० टक्के दूध सहकारी संघांना जाते. या निर्णयाचा फायदा वीस टक्के शेतकऱ्यांना होणार असला तरी ८० टक्के दूध उत्पादक मात्र पुन्हा वाऱ्यावर सोडण्यात आल्याचे चित्र आहे.

एक जानेवारी २०२४ पासून दूध संकलनाचे नवीन मस्टर सुरू होते. येत्या आठवड्यात दूध उत्पादकांना पाच रुपयांच्या या अनुदानासह बिल मिळेल अशी शक्यता आहे . मात्र सरकारच्या आदेशानुसार ११ जानेवारी ते २० फेब्रुवारी पर्यंतच हे अनुदान मिळणार असल्याचे विश्वसनीय रित्या समजते.

दरम्यान पशुखाद्याचे वाढते दर , दुधाला मिळणारा दर यामुळे आर्थिक गणित जुळत नसल्याने दूध उत्पादक पुरता हैराण झाला आहे .त्यासाठी सरकारने घोषणा करत दिलासा दिला खरा , पण आता अंमलबजावणी बाबत मात्र जाणीवपूर्वक चाल ढकल सुरू आहे. ही चाल ढकल अशीच करत न्यायचे आणि साधारण मार्चमध्ये लिंक सीजन सुरू होतो . तेव्हा आपोआप दुधाचे दर काहीसे वाढतात तेव्हा अनुदान देण्याबाबत भूमिका घ्यायची अशा या चालढकलीमागे सरकारचा डाव असल्याचे दिसते

# पीएचडी संशोधक विद्यार्थी बार्टीच्या सीईटी परीक्षेवर टाकणार बहिष्कार

## सीईटी रद्द करून सरसकट छात्रवृत्ती देण्याच्या मागणीबाबत दिशाभूल झाल्याचा आरोप

**पुणे:** अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांना पीएचडी संशोधनासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे (बाटी) कडून संशोधन कार्यासाठी विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती(BANRF) देण्यात येते. त्याअनुषंगाने २०२२ मध्ये महाराष्ट्रातील विद्यापीठामध्ये पीएचडीसाठी अधिकृत नोंदणी झालेल्या संशोधक विद्यार्थ्यांनी बार्टीकडे अधिछात्रवृत्ती (फेलोशिप) साठी अर्ज केलेले आहेत. त्यावर बाटी कार्यालयाकडून कागदांची छाननी करून पात्र उमेदवारांची यादीही प्रसिद्ध करण्यात आली आहे. परंतु राज्यातील सारथी, महाज्योती आणि टाटी या संशोधन संस्थानी २०२२ साली कोणत्याही परीक्षा आणि मुलाखती न घेता पात्र विद्यार्थ्यांना सरसकट अधिछात्रवृत्ती (फेलोशिप) देतात. असे असताना बाटी तसे न करता परीक्षा आणि मुलाखतीची अट घालून फक्त २०० विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती देण्याचा घाट घालते आहे.




अनुसूचित जातीतील विद्याथी संशोधनाच्या माध्यमातून राज्याला आणि देशाला शिक्षण क्रांतीचे वळण देवू इच्छित आहेत. संशोधनासाठी संशोधकांना अर्थसहाय्याची गरज असते. याच पाश्वर्भूमीवर २०२२ च्या पात्र विद्यार्थ्यांनी बाटी प्रशासन तसेच राज्यातील आमदार, खासदार यांचेकडे वेळोवेळी निवेदने दिली आहेत. त्यावर बाटी प्रशासनाने दुर्लक्ष करत विद्यार्थ्यांच्या सरसकट अधिछात्रवृत्तीच्या मागणीला केराची टोपली दाखविण्यात आली आहे.

तसेच २० सप्टेंबर २०२३ पासून बाटी कार्यालय क्वीन्स गार्डन पुणे समोर आमरण उपोषण केले. त्यानंतर बाटी कार्यालयाने तुमचा प्रस्ताव शासन स्तरावर पुढे पाठवत असल्याचे सांगत आमरण उपोषण मागे घेण्यास सांगितले. असे असताना त्यानंतर विध्यार्थ्यानी धरणे आंदोलन सुरु ठेवले त्या आंदोलनाचा आजचा ११० वा दिवस उजडलेला असतानाही बाटीने पुन्हा परीक्षा घेण्याचे पत्रक काढले आहे.

यापूर्वी २४ डिसेंबरला होणारी सीईटी परीक्षा रद्द करावी यासाठी विद्यार्थ्यांनी ११ डिसेंबर रोजी आंदोलन केले असता बाटीचे महासंचालक सुनील वारे यांनी विध्यार्थ्यांना परीक्षा ही एक विहित प्रक्रियेचा भाग म्हणून द्या. पुढे सरसकटचा प्रस्ताव आम्ही बार्टीकडून शासन स्तरावर पाठवू असे आश्वासन दिले.

त्यांच्या या आश्वासनवर विद्यार्थांनी परीक्षा दिली असता सरसकट चा प्रस्ताव शासन स्तरावर मंजूर झाला नसल्याचे सांगितले. सामाजिक न्याय विभागाचे सचिव सुमंत भांगे यांच्याकडून या प्रस्तवाला विरोध असल्याचे सांगण्यात येत आहे. शासन स्तरावर प्रस्ताव मांडला असता त्याला मान्यता नाकरण्यात येत आहे.

मात्र आता पुन्हा १० जानेवारीला परीक्षा सर्व विद्यार्थ्यांनी द्यावी असे पत्रक बाटीने जाहीर केले. २४ डिसेंबरला झालेल्या या परीक्षेत प्रश्नपत्रिकाही फुटली होती. छत्रपती संभाजीनगर येथील देवगिरी महाविद्यालयात सील उघडी असलेली प्रश्नपत्रिका विध्यार्थ्यांना देण्यात आली. या पेपरफुटीबाबतही सेट विभागाकडून कोणताही खुलासा केला गेला नाही. असा सर्व सावळा कारभार शासनाचा सुरु असताना यात विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होत आहे.

२९ डिसेंबरला २०२२ चे संशोधक पात्र विद्याथी कृती समिती अणि युवा वंचित बहुजन आघाडीचे सचिव राजेंद्र पातोडे यांच्या आंदोलनानंतर बाटीचे महासंचालक सुनील वारे यांनी सीईटी परीक्षा रद्द झाल्याचे जाहीर केले. त्याचे लेखी पत्रक विद्याथी तसेच बाटीचे अधिकृत वेबसाईटवरही जाहीर केले. मात्र, २ जानेवारी २०२४ रोजी सायंकाळी बाटीने वेबसाईटवरील परीक्षा रद्दचे पत्रक काढून परीक्षा ठरलेल्या तारखेस १० जानेवारीस होणार असल्याचे पत्रक जारी करत विद्यार्थ्यांची दिशाभूल केली आहे.

तरी याबाबत बार्टीने विध्यार्थ्यांची फसवणूक केली असल्याबाबत युवा वंचित बहुजन आघाडीचे सचिव राजेंद्र पातोडे यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. मात्र, या सर्व कारभारात विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होत आहे. तीन महिने आंदोलन करून अद्याप मागणी मान्य होत नाही. आंदोलनाला हजेरी लावत असल्याने अभ्यासचे नुकसान होत आहे. महाविद्यालयातील शुल्क भरण्यास पैसे नाहीत, अशी परिस्थिती आहे. त्यामुळे हतबल झालेलं आम्ही विध्याथी आता सीईटी परीक्षा देणार नाहीत. या परीक्षेसाठी येण्याजाण्याचा मोठा वाहतूक खचही विद्यार्थांना परवडणारा नाही. त्यामुळे आता विद्याथी परीक्षा न देणार असल्याची भूमिका घेत सर्व विद्यार्थ्यांनी cet परीक्षेवर बहिष्कार टाकला आहे, अशी माहिती बाटी संशोधक विद्याथी संघर्ष कृती समिती २०२२ महाराष्ट्र राज्य कडून देण्यात आली.

# मोहोळमध्ये शिंदे सेनेला मिळाला नवा शिलेदार?

## मोहोळ मतदारसंघात कामाच्या जोरावर खरेंची विधानसभेची दावेदारी

**नवनाथ खिलारे**

**पंढरपूर :** गेल्या तीन टर्ममध्ये प्रत्येक निवडणुकीत नवा आमदार निवडून देणाऱ्या मोहोळ मतदार संघातील जनतेचा कौल यंदाही त्याच दिशेने चाललेला दिसत आहे.गेल्या वर्षभरापासून या मतदारसंघात विद्यमान लोकप्रतिनिधींपेक्षा मोहोळ येथील उद्योजक आपल्या सामाजिक कार्याच्या जोरावर प्रसिद्धीच्या शिखरावर पोहोचले आहेत.रोज अनेक ठिकाणी वैयक्तिकरित्या लाखो रुपयांची मदत करत तसेच अनेक लोकांना जीवनावश्यक वस्तू,रस्ते,पिण्याचे पाणी यासारख्या मूलभूत प्रश्नांची सोडवणूक स्वखर्चातून करत राजू खरे यांनी या मतदारसंघात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.गेल्या वर्षभरात त्यांनी या कामाच्या जोरावर या मतदारसंघात आपली ओळख आणि दावेदारी निश्चित केली आहे.त्यामुळे शिंदे गटाच्या शिवसेनेच्या कोट्यातून त्यांना या जागेची उमेदवारी मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

सध्या मोहोळ मतदारसंघात विद्यमान आमदार यशवंत माने,



त्याचबरोबर तेथील स्थानिक मातब्बर नेत्यांनीही आगामी विधासभा व लोकसभेची तयारी सुरू केली आहे.प्रत्येक पक्षाकडून आपापल्यापरीने निवडणूक लढविण्यासाठी रणनीती आखली जात असतानाच शिवसेनेच्या राजू खरे यांनी आपल्या कामाच्या जोरावर टक्कर द्यायला सुरुवात केली आहे.गेल्या वर्षभरापासून त्यांनी मोहोळ मतदार संघात कामाचा सपाटा लावला असून यामुळे येत्या काही महिन्यातच होणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीत त्यांनी मोहोळ मतदार संघावर आपली दावेदारी सिद्ध केली आहे.मात्र यामुळे मोहोळ मतदार संघातील मातब्बर नेत्यांनाही प्रसिद्धीच्या झोतात येण्यासाठी व आपले अस्तित्व टिकवण्यासाठी भलताच घाम गाळावा लागणार हे मात्र निश्चित आहे.

# लोकशाही संपवण्यासाठी लोकशाही मार्ग!

लोकशाही मार्गाने निवडून सत्ताधीश झाल्यावर तहहयात सत्ताधीश राहण्याची व्यवस्था करायची, लोकशाही संस्थांचा वापर लोकशाही संस्था उद्ध्वस्त करण्यासाठी करायचा, लोकप्रिय धोरणे राबवून लोकांना त्यांच्या पायावर उभे राहू न देता आश्रितांची फौज निर्माण करायची हीच ती लोकशाही मार्गाने लोकशाही नष्ट करण्याची नवी शैली विकसित झाली आहे.

ऱ्हासपर्व ते सरते ना या मथळ्याचे संपादकीय (५ जानेवारी) वाचले. एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात ट्युनिशिया, मरोक्को, सीरिया, लिबिया, इजिप्त, बहारीन यासारख्या मुस्लीमबहुल देशात तेथील जुलमी शासन सत्तांच्या विरोधात उठाव होऊन लोकशाहीचा विस्तार होऊ लागला. या घटनेचे जागतिक समुदायाने ह्यलोकशाहीचा वसंत ऋतूह्ल म्हणून हर्षोल्हासाने स्वागत केले होते. परंतु लवकरच लोकशाहीविरोधी क्रमशः तिथे व अन्यत्र ज्या घटना घडत गेल्या त्यामुळे लोकांच्या मनातील ते दिवास्वप्न ठरले आहे. विसाव्या शतकात लोकशाही उद्ध्वस्त करण्यासाठी प्रामुख्याने लष्करी मार्गाचा वापर झाला. दोन महायुद्धांदरम्यान जमनी, इटली, स्पेन या देशांत तर महायुद्धोत्तर काळात, आशिया खंडातील अफगाणिस्तान, पाकिस्तानसह चिली इत्यादी देशांत, बंदुकीच्या मार्गाने लोकशाही नष्ट करण्याचा प्रयत्न झाला. परंतु यात आता आणखी एका मार्गाची भर पडली आहे, ती म्हणजे लोकशाही मार्गाने निवडून दिलेले सरकारच लोकशाहीचा गळा घोटताना दिसत आहे. अर्जेंटिना, ब्राझील, घाना, ग्वाटेमाला, डोमिनिकन गणराज्य, टर्की, पेरू, थायलंड, उरुग्वे या देशांतही लोकशाही मार्गांनी लोकशाही समाप्त करण्याचा प्रयत्न झाला. अमेरिकेसारखी बलाढ्य सत्ताही यातून सुटली नाही. ट्रम्पवादाच्या उदयानंतर तिथे लोकशाही मोठ्या प्रमाणात आकुंचन पावली आहे. कॅपिटॉलवरील हल्ल्याच्या संदर्भात तेथील सर्वोच्च न्यायालय काय निकाल देते आहे, याकडे आता संपूर्ण जगाचे लक्ष वेधले आहे. लोकशाही मार्गाने निवडून सत्ताधीश झाल्यावर तहहयात सत्ताधीश राहण्याची व्यवस्था करायची, लोकशाही संस्थांचा वापर लोकशाही संस्था उद्ध्वस्त करण्यासाठी करायचा, लोकप्रिय धोरणे राबवून लोकांना त्यांच्या पायावर उभे राहू न देता आश्रितांची फौज निर्माण करायची हीच ती लोकशाही मार्गाने लोकशाही नष्ट करण्याची नवी शैली विकसित झाली आहे. भारतातील वास्तवही यापेक्षा वेगळे नाही.

अमेरिकेतील लोकशाही अडचणीत आणणाऱ्या घटना भारतातील बदलत्या राजकीय घटनांना रिलेट करणाऱ्या वाटत होत्या. जग जणू उदारमतवादाला विटून जहालमतवादाकडे झुकत चालल्यासारखे वाटू लागले आहे. सत्ता काबीज करण्यासाठी लोकशाही मूल्ये पायदळी तुडवणाऱ्या डोनाल्ड ट्रम्पसारख्या हुमदांडग्या मनोवृत्तीला समर्थक मिळतात; हीच मोठी शोकांतिका आहे. या मनोवृत्ती लोकशाहीनेच दिलेल्या स्वतंत्र्याचा गैरवापर करून आपले जहाल विचार पेरतात, आणि राजकीय जमीन तयार करतात. सत्ता मिळाली की, ज्या लोकशाहीने दिलेल्या स्वातंत्र्यामुळे सत्तेपर्यंत पोहोचलो; त्या लोकशाहीचाच गळा घोटण्याचे काम करतात. लोकशाहीच्या रक्षणासाठी निर्माण केलेले स्तंभच लोकशाहीचे रक्षण करण्यास असमर्थ ठरू लागले, तर लोकशाहीचे नष्टचर्य निश्चित आहे.

पोलीस, सदोष ड्रायव्हिंग लायसन्स वितरण व्यवस्था आर्दीबद्दल भाष्य केलेले आहे. मुळात, हे सगळे मध्यम वगीय लोकांचे ठोकताळे आहेत ज्यात वाऱ्यावर सोडून दिलेल्या असंघटित चालक वर्गाला दूषणे देण्याचा नेहमीच प्रयत्न असतो आणि समस्या जैसे थे राहते. त्यासाठी कुणीही चालकाच्या नजरेतून बघायचे कष्ट घेत नाही. कुणीही कष्टकरी माणूस ऐतखाऊ, पळकाढू नाही. दिलदार चालक वर्गाला सन्मान आणि सुरक्षित जीवन जगण्याची इच्छा असूनही तशी सोयच समाजव्यवस्थेत नाही. सापत्न वागणूक हे त्याच्या पाचवीला पुजलेले आहे. सगळे जण त्याची सेवा घेतात, पण सेवा देणारा वर्ग झ्र मग तो रिक्षाचालक, फेरीवाला, ट्रक झ्र टॅक्सी- रेल्वे बस चालक कुणीही असो, नेहमीच टीकेचा धनी आहे.

समृद्धीचा ध्यास घेणारे आणि काळजीवाहू गतिमान सरकारने ट्रक ड्रायव्हर यांना दर शे झ्र दोनशे किमी अंतरावर ताजेतवाने होण्याची किती सोय महामार्गांवर केलेली आहे याबाबत श्वेतपत्रिका काढावी एकदाची! पण, ह्या प्रश्नावर सरकार मूग गिळून सोयीस्कर गप्प बसले आहे. स्वतःची चूक झाकून चालकवर्गाला आरोपी बनवण्याचे सरकारचे कसब भारीच! तेव्हा नव्या फौजदारी कायद्याच्या अंमलबजावणीप्रमाणेच, मूळ सार्वत्रिक कल्याण साधण्यासाठी चालकांना मोटार ट्रान्सपोर्ट वर्कर्स ॲक्ट- १९६१ या कायद्यानुसार देय सोयीसुविधा तसेच बदलत्या काळात अपेक्षित संभाव्य सोयीसुविधा यांवर देखील सखोल अभ्यासपूर्ण मंथन झाले पाहिजे.

संप सुटला, समस्येचं काय? हा सत्यजीत तांबे यांचा लेख वाचला. वाहनचालकांच्या बेजबाबदार ड्रायव्हिंगला आळा घालण्याच्या उद्देशाने केलेला हा कायदा प्रथमदर्शनी चांगलाच वाटतो, परंतु अनेक अपघात हे खड्डयांमुळे झाल्याचे पुरावेदेखील आहेत. वाहन चालवताना अचानक आलेला खड्डा चुकविण्याचा प्रयत्न ड्रायव्हरकडून केला जातो व त्यामुळे एखादा मोठा अपघात घडतो. अशा प्रकरणात खरा दोषी कोण? रस्त्याचे काम घेतलेला कंत्राटदार, की वाहनावरील ताबा सुटलेला चालक? याचेही विश्लेषण या कायद्यात होणे गरजेचे आहे. दुसरे म्हणजे रस्त्यावर मोकाट फिरणारी जनावरे, मोकाट कुत्ते यांचा बंदोबस्त कोणी करायचा? या विचित्र घटनांमुळेसुद्धा अनेक अपघात घडत असतात. या सर्व अपघातांसाठी प्रत्येक वेळी चालकाला जबाबदार धरणे योग्य ठरणार आहे का? याचाही विचार या कायद्यामध्ये करण्यात यावा. कायदा लागू करताना या सर्व बाबींचा सांगोपांग विचार झाल्यास हा कायदा नक्कीच प्रभावी ठरेल.

आपला देश कसा हुकूमशाहीकडे वाटचाल करत आहे.

**भागा वरखडे**

विरोधकांना निलंबित करणे काय किंवा स्वायत्त संस्था, प्रसार माध्यमे बळकावणे किंवा तपास यंत्रणांचा गैरवापर वगैरे वगैरे. या अगोदर विरोधकांना कधी संसदेतून निलंबित केले गेले नव्हते काय? किंवा अगोदरच्या सरकारांनी सीबीआयसारख्या संस्थांचा गैरवापर केला नव्हता का? विद्यमान पंतप्रधान मोदी यांना छळण्यासाठी सीबीआयचा सर्वात जास्त गैरवापर तर काँग्रेस सरकारने केला होता. पण ते त्यांना त्यात अडकवू शकले नाहीत. किंबहुना काँग्रेसच्या कार्यकाळातच न्यायालयाने मोदी यांची गुजरात दंगलीप्रकरणी निर्दोष सुटका केली आहे. नेहरू, इंदिराजी यांच्या काळात त्यांना आव्हान देणारा सक्षम विरोधी पक्षच नव्हता, पण त्यावेळी कुणीही आपल्या देशाची वाटचाल हुकूमशाहीकडे होत आहे असे म्हणाले नव्हते! अगदी इंदिरा गांधी यांनी आणीबाणी घोषित केली तेव्हासुद्धा! विद्यमान सत्तेविरुद्ध आपण जे काही लिहित आहात त्याला प्रसिद्धी मिळत आहे ही लोकशाही नव्हे काय? हुकूमशाही असती तर एवढे बोलण्याचे स्वातंत्र्य तुम्हाला दिसले असते का?

अगदी दोन-तीन दिवसांपूर्वीच आपल्या सरन्यायाधीशांनी दिलेल्या एका मुलाखतीच्या बातमीनुसार, रामजन्मभूमी खटल्याचा निकाल आपल्या सर्वोच्च न्यायालयाने निनावी ठेवला आहे. तर सध्याची छापील आणि दृकश्राव्य माध्यमे विरोधकांचे म्हणणे रेटताना दिसत नाहीत. सांप्रत काळी बहुतांश माध्यमे ही पाठीचा कणा ताठ ठेवून सडेतोड भाष्य करण्याऐवजी सरकारी भाट बनण्यातच मश्गूल आहेत. बरेच कलाकार, खेळाडू (साक्षी मालिक, विनेश फोगट, बजरंग पुनिया असे मोजके अपवाद सोडले तर) सरकारवर स्तुतिसुमनेच उधळत आहेत. तर देशातला एक मोठा वर्ग फक्त भुलवणाऱ्या उत्सवांमध्येच मग्न आहे. एकंदरीत कोणाला भारतीय लोकशाही, संविधान, नियामाधारित व्यवस्था यांची फिकीर उरलेली नाही.

## जाती निर्मूलनासाठी आंतरजातीय विवाह सोहळे झाले पाहिजे : रामदास आठवले



डिसीएम.सोसायटीचे सेक्रेटरी विशाल शेवाळे यांच्या मुलाच्या मंगल सोहळा प्रसंगी केंद्रीय सामाजिक न्याय विभाग राज्य मंत्री रामदास आठवले, राष्ट्रीय महिला आघाडी अध्यक्षा स्मितताई आठवले, आदी मान्यवर

**हडपसर/ पुणे :** देशात जाती व्यवस्था निर्मुलन करायचे झाले तर आंतरजातीय विवाह सोहळे झाले पाहिजे, आणि ठरवून झाले पाहिजे, मी ही आंतरजातीय विवाह केलेला आहे, शेवाळे यांनी ही आंतरजातीय विवाह केला आहे, त्यांनी सिंधी समाज आमच्या पक्षात आणायला हवे असे मत केंद्रीय सामाजिक न्याय विभाग राज्य मंत्री रामदास आठवले यांनी नाना पेठ डिसीएम सोसायटी कॉलेज मैदानावर रिपाइंचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष विशाल शेवाळे यांच्या मुलगा सिद्धार्थ व सुष्मिता यांचा मंगल परिणय सोहळा आयोजित करण्यात आला होता यावेळी ते वधुवरांना शुभ आशीवाद देण्यासाठी आले असता ते मंगल समयी बोलत होते, यावेळी त्यांच्या सोबत रिपब्लिकन पक्ष राष्ट्रीय महिला अध्यक्षा स्मितताई आठवले,

माजी उपमहापौर डॉ. सिद्धार्थ धेंडे, रामदास आठवले यांचे स्वयीय सहाय्यक प्रवीण मोरे, डिसीएम सोसायटीचे चेअरमन डी.टी. रजपूत, जनरल सेक्रेटरी विशाल शेवाळे, काजल शेवाळे, पुरषोत्म दास पहुजा, जयवंती पहुजा, रिपाइं महाराष्ट्र प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव, शहर अध्यक्ष संजय सोनवणे, अशोक शिरोळे, अशोक कांबळे, रिपाइं महिला अध्यक्षा शशीकला वाघमारे, संघमित्रा गायकवाड, मंगल रासगे, उपाध्यक्ष महादेव कांबळे, राजू कांबळे, अशिष आल्हाट आदी मान्यवर उपस्थित होते.

## माणची पत्रकारिता नेहमीच मार्गदर्शक

म्हसवड : प्रशासनात काम करताना आमच्यासमोरही काही अडचणी असतात त्या अडचणी जाणुन घेवुन त्या शासन दरबारी पत्रकार हे मांडत असल्याने प्रशासनाच्या अनेक अडचणी दुर होण्यात मदत होते त्यामुळे सवर्सामान्यांचे प्रश्न ही त्वरीत मागी लागले जातात या सर्व घटना ह्या एका बातमीमुळे घडु शकतात त्यामुळे माझ्या प्रशासकीय सेवेत पत्रकारांची भूमिका ही नेहमीच माझ्यासाठी मार्गदर्शक अशी राहिली असल्याचे मत माण - खटावच्या प्रांताधिकारी उज्वला गाडेकर यांनी व्यक्त केले.



पत्रकार दिनानिमीत्त म्हसवड येथील क्रांतिवीर शैक्षणिक संकुल येथे आयोजीत कार्यक्रमात त्या प्रमुख पाहुण्या म्हणुन बोलत होत्या, यावेळी क्रांतिवीर शैक्षणिक संकुलनाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. विश्वंभर बाबर, मुख्याध्यापिका सुलोचना बाबर, जेष्ठ पत्रकार बापुराव गुंजवटे, पत्रकार संघाचे अध्यक्ष विशाल गुंजवटे, हिंदवी गुंजवटे, दहिवडी संघाचे उमेश बुधावले, लालासाहेब दडस आदी प्रमुख उपस्थित होते. पुढे बोलताना प्रांताधिकारी गाडेकर म्हणाल्या की ज्या शैक्षणिक संकुलनामध्ये आज माणच्या पत्रकारांचा गौरव होत आहे त्या संकुलनाचे प्रमुख प्रा.बाबर यांनी सुध्दा एक पत्रकार म्हणुन माण तालुक्यात खुप चांगले काम यापुवी केले आहे, एक पत्रकार ठरवले तर काय करु शकतो याचे मुतीमंत उदाहरण म्हणजे म्हसवडचे क्रांतिवीर शैक्षणिक संकुल आहे, या संकुलनामध्ये सि बी एस सी पॅटर्न सुरु करणारे हे तालुक्यातील प्रथम विद्यालय ठरले आहे. माण तालुक्यात प्रशासन अधिकारी म्हणुन काम करीत असताना आमच्याकडुनही काही घटना, गोष्टी दुर्लक्षीत होत असतात त्या आमच्या समोर आणुन देणारे हे येथील पत्रकारच आहेत त्यांच्यामुळे आज सवर्सामान्यांची अनेक किरकोळ कामे ही मागी लागत आहेत, तर एखाद्या घटनेकडे सर्वांनीच लक्ष वेधल्याने तालुक्यातील अनेक प्रकल्प, योजना ह्या सामान्य जनतेपर्यंत पोहचत आहेत. माणमधील रस्ते, पाणी, विज, पिक विमा, अवैध धंदे, चोर्या, फसवणुक, लुबाडणुक, यासारख्या अनेक घटनांवर येथील पत्रकारांचे बारकाईने लक्ष आहे याची प्रचिती आपणाला वारंवार येत आहे. त्यामुळे माणची पत्रकारिता ही एकप्रकारे मार्गदर्शक अशी आहे असे ही शेवटी प्रांताधिकारी गाडेकर यांनी सांगितले.

यावेळी प्रा. विश्वंभर बाबर यांनी बदलत्या पत्रकारीतेचे स्वरुप मांडताना १९९० च्या दशकातील पत्रकारीतेतील काही समस्या मांडल्या, तर शैक्षणिक संकुल उभारताना पत्रकारांची त्यावेळी झालेल्या मदतीचाही आवर्जुन उल्लेख केला. यावेळी मुख्याध्यापिका सुलोचना बाबर यांनी क्रांतिवीर शैक्षणिक संकुलनाचा आलेख मांडताना विद्यालयात राबवण्यात येत असलेल्या सर्व शैक्षणिक उपक्रमाची व क्रिडा प्रकारांची माहिती दिली, तर या विद्यालयातील सर्व उपक्रमांची बातमी ही येथील पत्रकारांकडुन सातत्याने दिली जात असल्यानेच आज हे विद्यालय जिल्ह्यात नव्हे तर राज्यात पोहचले असल्याचे सांगितले.

यावेळी जेष्ठ पत्रकार बापुसाहेब गुंजवटे, लालासाहेब दडस, विठ्ठल काटकर, एकनाथ गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी जेष्ठ पत्रकार एल.के. सरतापे, महेश कांबळे, अहमद मुल्ला, सचिन मंगरुळे, बापुसाहेब मिसाळ, दौलत नाईक, फिरोज तांबोळी, संदिप जठार, रुपेश कदम, लिंगराज साखरे, अभिजीत अवघडे, नवनाथ भिसे, प्रवीण राजे, सागर बाबर आदी पत्रकार उपस्थित होते.

### विद्यार्थिनींचीही मनोगते

यावेळी विद्यालयातील गागी बनसोडे या विद्यार्थिनीने जांभेकर व आजची पत्रकारीता अन समाजातील पत्रकारांचे स्थान याबद्दल अत्यंत थोडक्या शब्दात पण खुप महत्वपुर्ण असे मनोगत व्यक्त करुन सर्वांची शबासकी मिळवली, तर समृध्दी जाधव या विद्यार्थिनीने छ. शिवाजी महाजांबद्दल आपले विचार मांडताना छ. शिवाजी महाराज या नावातील प्रत्येक अक्षराचा अर्थ समजुन सांगितल्याने पत्रकारांसह उपस्थित पाहुणेही अवाक झाले.

### जांभेकरांच्या प्रतिमेचे पुजन व दिप प्रज्वलन

क्रांतिवीर शैक्षणिक संकुलनात आयोजीत पत्रकार दिन साजरा करताना पत्रकारीतेतील आद्य जनक म्हणुन ज्यांना गणले जाते त्या स्व. बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पुजन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

## हडपसर विधानसभा भाजपा युवा मोर्चा अध्यक्षपदी बाळासाहेब घुले यांची निवड



**हडपसर :** भारतीय जनता पक्ष हडपसर विधानसभा मतदार संघ भाजप युवा मोर्चा अध्यक्ष पदी महंमदवाडीतील भाजप कार्यकर्ते बाळासाहेब घुले यांची नियुक्ती करण्यात आली. निवडीचे पत्र भाजप प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते देण्यात आले. कोंढवा येथील लोणकर हॉल मध्ये भाजप कार्यकर्ता मेळावा आयोजित करण्यात आला होता यावेळी भाजप पक्षाकडुन विविध पदांचे वाटप करण्यात आले होते.

यावेळी कार्यकर्ता मेळाव्यास मार्गदर्शन करतेवेळी , पदांचे वाटप करताना भाजप प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, हडपसर माजी आमदार योगेश टिळेकर, शहर अध्यक्ष, माजी नगरसेविका रंजना टिळेकर, उज्वला जंगले, विजय मोरे, नितीन होले, संदिप दळवी, हनुमंत घुले, स्मिता गायकवाड, सिमा शेंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

भाजप युवा मोर्चा अध्यक्ष पदी निवड झाल्यावर बाळासाहेब घुले म्हणाले की, आमचे मार्गदर्शक माजी आमदार योगेश टिळेकर यांच्या मार्गदशर्नानुसार पक्षाचे ध्येय धोरण तळागाळापर्यंत पोहचविणार, पक्षात जास्ती जास्त तरुणवर्ग सहभागी करुन पक्षाची ताकद हडपसर मतदार संघात वाढविणार असल्याचे बाळासाहेब घुले यांनी सांगितले

## 'तुम्ही एकमेकांना मान द्या, तर प्रेक्षक तुमचा मान राखतील'

### राज ठाकरे यांचा मराठी कलाकारांना सल्ला

**पिंपरी:** मी जेंव्हा इतर भाषेतील कलाकारांना भेटतो तेंव्हा ते एकमेकांना खूप आदराने हाक मारतात. मात्र, मराठी कलाकार एकमेकांसोबत त्या आदबीने वागताना दिसत नाही. तुम्ही जर एकमेकांना मान नाही दिला तर, प्रेक्षक तुमचा मान कसा राखतील? त्यामुळे एकमेकांना मान द्या अन दुसऱ्याचा मान ठेवा, असा सल्ला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी रविवारी मराठी कलाकारांना दिला.



शंभराव्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनात आज राज ठाकरे यांची ' नाटक आणि मी' या विषयावर मुलाखत झाली, यावेळी ते बोलत होते. अभिनेते दीपक करंजीकर यांनी ठाकरे यांच्याशी संवाद साधला. यावेळी १०० वे अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष जब्बार पटेल, अखिल भारतीय नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले, नाट्य संमेलनाचे आयोजक भाऊसाहेब भोईर, नाट्य परिषद पिंपरी चिंचवड शाखेचे कार्याध्यक्ष राजेशकुमार साकला, उपाध्यक्ष कृष्णकुमार गोयल, सचिन इटकर आदि मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना राज ठाकरे म्हणाले, पूवीच्या काळी मराठी चित्रपट व नाट्यसृष्टीत अनेक सुपरस्टार होते. मात्र आता केवळ कलाकार राहिलेले आहेत. मराठी कालाकार एकमेकांशी बोलताना टोपण नावाने हाक मारतो. तुम्ही एकमेकांना मान दिला नाही तर प्रेक्षक तुम्हाला मान कसा देतील, असाही प्रश्न त्यांनी उपस्थित केला. तसेच एकमेकांना मान दिला तर मराठी रंगभूमीला चांगले दिवस येतील असेही ते म्हणाले.

शंभराव्या नाट्य संमेलनात माझ्या मुलाखतीचा विषय ह्यनाटक आणि मीह्ल असा आहे. मात्र मला वाटते मुलाखतीचा विषय 'मी केलेली नाटकं' असा हवा होता, अशी मिश्किल टिपणी करत राज ठाकरे म्हणाले, नाटक न पाहीलेला मराठी माणूस सापडणे अवघड आहे. मराठ्यांचा इतिहास पाहिला तर तो नाटक ते अटक असा आहे. महाराष्ट्राने नेहमीच देशाचे नेतृत्व केले आहे. छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इथेच मोठे झाले. आपण राज्यकर्ते होतो पण आपण आपला इतिहास विसरत चाललो आहोत. शंभर फोटो इथे लागले आहेत त्यांना आजची अवस्था बघितल्यावर काय वाटत असेल?

फिल्म मेकिंग हे माझं पहिलं प्रेम आहे, मात्र नाटकाबद्दल माझ्या मनात कायम कुतूहल आहे. चित्रपट, मालिका आणि नाटकं यामध्ये नाटक हे सर्वात आव्हानात्मक माध्यम आहे असे मला वाटते. परदेशात गेल्यावर आपण मोठमोठी नाट्यगृह पाहतो. उत्तम दर्जाची नाटकं पाहतो. ती आपल्याकडे पण व्हायला पाहिजेत. त्यासाठी नाट्य क्षेत्रातील कलाकारांनी प्रस्ताव तयार करावा. तुमची मागणी पूर्ण व्हावी म्हणून मी पुढाकार घेईल, असा शब्द देखील राज ठाकरे यांनी यावेळी दिला.

## भीमनगर येथे आरोग्य शिबिर संपन्न




**हडपसर :** बी.टी.कवडे रोड ,भिमनगर , घोरपडी भागातील नागरीकांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते ,आरोग्य शिबिर सामाजिक कार्यकर्ते मनोज प्रक्षाळे यांच्या वतीने भिम नगर या भागात आरोग्य शिबिराच्या आयोजन करण्यात आले होते सामाजिक संस्था डॉन बॉस्को डेव्हलपमेंट सोसायटी यांच्या सहकार्यातून संस्थेच्या वतीने मोफत शुगर ,बीपी, जनरल हेल्थ तपासणी, स्त्रीरोग तपासणी, डॉन बॉस्को डेव्हलपमेंट सोसायटीचे प्रोजेक्ट कॉर्डिनेंटर नागसेन चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली तसेच डॉक्टर अनिल कुमार मुन डॉक्टर प्रियंका केदारी यांनी तपासणी केली.यावेळी शिबीराचे आयोजक मनोज प्रक्षाळे,संस्थेचा सामाजिक कार्यकर्ता प्रिया सोनवणे लीना गायकवाड आदी उपस्थित होते.महिलांसाठी कायदेशीर मोफत सल्ला ॲड यास्मिन वडणकुट्टी मार्गदर्शन शिबीरात देण्यात आले शिबीरात जवळपास. ३७० रुग्णांची मोफत तपासणी करून मोफत औषधे व रक्त तपासणी करण्यात आली अशी माहिती विश्वरत्न संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मनोज प्रक्षाळे यांनी दिली



पुणे शहर काँग्रेस अध्यक्ष अरविंद शिंदे यांचा वाढदिवस कोरेगावपार्क येथील अंधशाळेमध्ये साजरा केला

मुख्य *संपादक : नरेश विठ्ठल देसाई हे दैनिक राजदंड मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा. लि., सर्व्हे नं. १२९, हिस्सा नं. ११ / २ आणि १ / १३, वारजे पुणे - ४११ ०५८ येथे मुद्रित करून न्याती ग्रँडीयर, १०२ ग्रीनविच, कडनगर, उंड्री, पुणे -४११ ०६० येथून प्रकाशित केले. दैनिक राजदंडमधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. (*पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी) दूरध्वनी : पुणे (०२०)२६९०९०३१, इमेल-rajdand.pune@gmail.com
या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या लेख, बातम्या, जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील.

# सबनीस विद्यामंदिराच्या कस्तुरी चव्हाण हीला राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक



**नारायणगाव** :- लखनौ, उत्तरप्रदेश येथे नुकत्याच झालेल्या ६७ व्या शालेय राष्ट्रीय मैदानी स्पर्धेत नारायणगाव येथील ग्रामोन्नती मंडळाच्या गुरुवर्य रा.प. सबनीस विद्यामंदिरातील

कु.कस्तुरी संदीप चव्हाण या विद्याथिनीने १४ वर्षाखालील मुलींच्या गटामध्ये ४ .१०० मीटर रिले या क्रीडा प्रकारात विक्रमी वेळेत प्रथम क्रमांकाने स्पर्धा पूर्ण करून सुवर्णपदक प्राप्त केले. अशी माहिती मुख्याध्यापिका अनुराधा पुराणिक आणि क्रीडा प्रमुख बबन गुळवे यांनी दिली.

या राष्ट्रीय स्पर्धेत तिला महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली होती. यापूर्वी तिने चंद्रपूर येथे झालेल्या राज्यस्तरीय शालेय मैदानी स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला होता.

या यशाबद्दल तिचे ग्रामोन्नती मंडळाचे अध्यक्ष प्रकाश पाटे,कार्याध्यक्ष अनिलतात्या मेहेर,उपाध्यक्ष सुजित खैरे,कार्यवाह रवींद्र पारगावकर,मुख्याध्यापिका अनुराधा पुराणिक उपमुख्याध्यापक सतीश तंवर,पयर्वेक्षक विलास शिंदे, रतीलाल बाबेल,सुषमा वाळिंबे यांनी विशेष अभिनंदन केले आहे.

या खेळाडूला क्रीडाशिक्षक बबन गुळवे, राहुल नवले,कावजी भवारी बाबासाहेब वळकुंदे, साहेबराव गाळव यांनी मार्गदर्शन केले.

# ... या प्रश्नाचे जनतेला उत्तर द्या' ! - प्रकाश आंबेडकर

**पुणेः** वंचित बहुजन आघाडी महाविकास आघाडीत सहभागी होण्यासाठी उत्सुक असल्याचा पुनरुचार करतानाच, आगामी लोकसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीचे जागावाटप अद्याप का झाले नाही, याचे उत्तर आघाडीच्या नेत्यांनी जनतेला द्यावे, या शब्दात वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी महाविकास आघाडीला ठणकावले आहे.

आपण महाविकास आघाडीला निश्चितपणे मदत करू. जो उमेदवार असेल त्याला निवडून आणू, असा मला विश्वास आहे. मात्र, जागा वाटपाबाबत काय काय ठरले, आघाडीतील कोणता पक्ष किती जागा लढविणार, आघाडीचे जागावाटप आत्तापर्यंत का झाले नाही,



हे सगळे आघाडीच्या नेत्यांनी जनतेला स्पष्टपणे सांगावे, अशी मागणी आंबेडकर यांनी केली आहे.

भारतीय जनता पक्षाला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी विरोधकांनी स्थापन केलेल्या इंडिया आघाडीच्या दिल्ली येथे होणाऱ्या बैठकीचे आमंत्रण आपल्याला मिळालेले नाही, असेही आंबेडकर यांनी स्पष्ट केले. इंडिया आघाडीच्या बैठकीची बातमी आपल्याला वृत्तपत्रातूनच कळली, असेही ते म्हणाले.

**... उद्या पुण्यातूनही निवडणूक लढवू**

अकोला लोकसभेची जागा वंचित बहुजन आघाडीने लढवावी, या शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्या विधानावर प्रतिक्रिया व्यक्त करताना आंबेडकर म्हणाले की, आमच्यासाठी केवळ अकोलाच महत्त्वाचे आहे असे नव्हे. मी अकोलाच काय, उद्या पुण्यातूनही निवडणूक लढवू शकतो. मी निवडणूक लढवणार किंवा नाही हे महत्त्वाचे नाही. ज्यांना ती लढवायची आहे त्यांनी लढवावी. आपण मदत करू, असेही ते म्हणाले.

कोरेगाव भीमा दंगलीच्या आधी त्या दिवशी काहीतरी घडणार असल्याची पूवर्सूचना पोलिसांनी दिली होती. त्या दिवशी नेमके काय काय घडले याची माहिती अद्याप आयोगासमोर आलेली नाही. ही माहिती मिळविणे अत्यंत महत्त्वाचे आहे, असे आपण आज पार पडलेल्या साक्षीत आयोगासमोर सांगितल्याचे आंबेडकर म्हणाले. यासंबंधी तत्कालीन मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयात ही माहिती गेली होती का, गेली असल्यास कोणत्या वेळी गेली, हे समजणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचीही साक्ष घ्यावी, अशी मागणी आपण आयोगाकडे केल्याचेही आंबेडकर यांनी सांगितले.

# राजमाता जिजाऊंच्या जयंतीदिनी होणार कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

## माय होम इंडियाचे संस्थापक सुनील देवधर यांनी दिली माहिती

**पुणेः** राजमाता जिजाऊ यांची ४२५ वी जयंती व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीच्यानिमित्ताने स्वामी विवेकानंद प्रतिष्ठान आणि माय होम इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या १५ कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात येणार आहे. राजमाता जिजाऊ गौरव पुरस्कार देऊन या महिलांचा गौरव करण्यात येणार आहे.

माय होम इंडियाचे संस्थापक सुनील देवधर यांनी याबाबत माहिती दिली आहे.१२ जानेवारी २०२४ रोजी सायंकाळी ४ ते ८ या दरम्यान पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिर येथे हा कार्यक्रम होणार असून, यावेळी राम मंदिर निर्माण आंदोलनाच्या अग्रणी नायिका साध्वी ऋतंभरा, स्वामी जितेन्द्रानंद सरस्वती, माढ्याचे खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, जेएनयुच्या कुलपति शांतिश्री धूलिपुडी पंडित, भाजप महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्षा चित्राताई वाघ, पद्मश्री मिलिंद कांबळे आणि इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

माय होम इंडियाचे संस्थापक सुनील देवधर यांच्या माध्यमातून सामाजिक पातळीवर विविध क्षेत्रात काम केले जात असून, या कार्यक्रमाच्या निमित्ताने पुणेकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन त्यांनी केले आहे.

# ठाण्यातील विविध सामाजिक संस्थांनी मांडलेल्या समस्या प्राधान्याने सोडविण्यावर भर देणार -अभिजीत बांगर

ठाणे : ठाणे महापालिकेचा अथर्संकल्प तयार करताना शहर विकासाच्या दृष्टीकोनातून ठाणेकरांच्या शहराविषयीच्या सूचनांचा अंतर्भाव व्हावा, म्हणून अथर्संकल्पपूर्व चर्चेसाठी महापालिका आयुक्त श्री. अभिजीत बांगर यांनी सुरू केलेल्या 'माज़्या नजरेतून बदलते ठाणे' या उपक्रमाचे दुसरे सत्र नुकतेच (04 जानेवारी) पार पडले. या सत्रात ठाण्यातील विविध सेवाभावी (अशासकीय) संस्थाचे प्रतिनिधींकडून नागरिक म्हणून शहराविषयी असलेल्या अपेक्षा यावेळी आयुक्त अभिजीत बांगर यांनी जाणून घेतल्या. घरकाम करणाऱ्यां महिलांच्या मुलांसाठी पाळणाघर, नाका कामगार, वृद्धाश्रमासाठी जागा, कचरावेचक महिला तसेच किन्नर समूहासाठी रोजगाराच्या संधी अशा विविध विषयांवर सर्वंकष अशी चर्चा करुन या चर्चासत्रात उपस्थित करण्यात आलेल्या मुद्दयांवर विचारविनिमय करुन निश्चितच मार्ग काढण्याच्या दृष्टीने महापालिका प्रयत्न करेल असा विश्वास आयुक्तांनी यावेळी व्यक्त केला.

या चर्चासत्रात उपायुक्त वर्षा दिक्षीतस्त्री मुक्ती संघटनेच्या संध्या डोंगरे, नीती फाऊंडेशन व मोफत अन्नसेवा देणाऱ्या अचर्ना मागी, रोटी बँकेच्या मनिषा पाटील, जयश्री फाऊंडेशनचे हरिशभाई गोगरी, वुमन्स वेल्फेअर फाऊंडशेन, शहरी बेघर निवारा केंद्राच्या मीनाक्षी उज्जैनकर, महिला बचत गट कोअर ग्रुपच्या कुंदा घनवटे, कचरावेचक महिलांसाठी काम करणाऱ्या सविता बालटकर, कचरावेचक महिला मंगल प्रधान, सामाजिक कार्यकर्त्या लक्ष्मीछाया काटे, किन्नर समूहाच्या अमृता सिंग, रेश्मा कांबळे आदी सहभागी झाले होते.

ठाणे शहरात नाका कामगारांची संख्या मोठी असून नाक्यानाक्यावर या कामगारांसाठी शेड उभारण्यात यावी, तसेच त्या ठिकाणी शौचालयाची सुविधा उपलब्ध करणे. घरकाम करणाऱ्या महिलांच्या मुलांसाठी पाळणाघरासाठी जागा उपलब्ध करुन देणे. शहरात ज्या ठिकाणी बांधकामे सुरू आहेत, त्या ठिकाणी काम करणाऱ्या कामगारांना सुरक्षेच्या दृष्टीने सेफ्टी किट उपलब्ध करावीत तसेच सुरक्षेबाबत जनजागृती निर्माण करण्याबाबतचे मुद्दे सामाजिक कार्यकर्त्या लक्ष्मीछाया काटे यांनी उपस्थित केले. याबाबत ज्या ठिकाणी बांधकामे सुरू आहेत त्या साईटची यादी घेवून आपण त्या ठिकाणी महापालिकेच्या माध्यमातून जनजागृती करावी असे आयुक्तांनी नमूद केले.

जयश्री फाऊंडेशन गरीब गरजू लोकांना जेवण पुरविते तर त्यांनी आजी आजोबांसाठी शाळा सुरू केली आहे, यासाठी आवश्यक असलेली जागा महापालिकेच्या माध्यमातून द्यावी असे माधुरी पाटील यांनी नमूद केली. तसेच या शाळा शहरातील विविध भागात सुरू केल्यास ज्येष्ठ नागरिकांची शिकण्याची सुप्त इच्छा पूर्ण होण्यास मदत होणार आहे. समाजातील उपेक्षितांचा विकास व्हावा यासाठी स्वयंसेवक नेमून विविध शाळांच्या माध्यमातून काम केल्यास त्याचा फायदा समाजाला होईल व उपेक्षित मुलांच्या समस्याही इतरांना समजतील असेही त्यांनी नमूद केले.

ठाणे महापालिकेच्या माध्यमातून स्वच्छता मोहिम प्रभावीपणे राबविली जात आहे. गृहसंकुलांतील दैनंदिन कचरा जमा करण्यासाठी कचरावेचक महिलांना नियुक्त करण्यात याव्यात जेणेकरुन त्यांना यामाध्यमातून रोजगार निमिती होईल. एकत्रित केलेल्या कच-याचे वगीकरण करुन यामधून भंगार स्वरुपात असलेले साहित्य वेगळे केले जाईल, या माध्यमातून देखील त्यांना उत्पन्न मिळू शकेल.

# 'पोलीस अधिकाऱ्यांकडून आमच्यावर होत आहे लैंगिक अत्याचार'

## मुंबई पोलीस दलातील आठ महिला पोलिसांचा आरोप

**मुंबईः** कमी काम देण्याचे आमिष दाखवून पोलीस उपयुक्त आणि दोन पोलीस निरीक्षक यांच्याकडून आम्हाला त्यांच्या शासकीय निवासस्थानी नेऊन आमच्यावर बलात्कार केला जात आहे, असा आरोप करणारे पत्र नागपाडा पोलीस ठाण्यात नियुक्तीवर असलेल्या आठ महिला पोलिसांनी पोलीस आयुक्त आणि मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांना पाठवले आहे. या पत्राची गंभीर दखल घेण्यात आली असून याप्रकरणी चौकशीही सुरू करण्यात आली आहे.

पोलीस ठाण्यात असलेला कामाचा ताण लक्षात घेऊन तो कमी करण्यासाठी आपल्याला कमी काम देऊ, असे आमिष पोलीस अधिकाऱ्यांनी आपल्याला दाखविले आणि त्यांच्या सरकारी निवासस्थानी नेऊन आमच्यावर बलात्कार केला, असा आरोप या महिलांनी आपल्या पत्रात केला आहे. या प्रकाराची वरिष्ठ पातळीवरून तातडीने चौकशी करण्यात यावी, अशी त्यांची मागणी आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह मुंबई पोलीस आयुक्तांनाही या महिला पोलिसांनी पत्र पाठवले आहे. पोलीस प्रशासन आणि गृहमंत्रालयाकडून या पत्राची गंभीर दखल घेण्यात आली असून त्याची सखोल चौकशी करण्यात येत आहे.

# ठाणे शहरातील आज पाणी नाही

**ठाणे** : ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील आनंदनगर येथील चिल्ड्र ट्रॉफिक पार्क ते न्यू होरायझन स्कूल पर्यत रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्याचे कामांतर्गत 450 मिमी व 300 मिमी व्यासाच्या जलवाहिन्या बाधित होत असल्याने त्या स्थलांतरीत करण्याचे काम आवश्यक आहे. सदर जलवाहिन्या स्थलांतरीत करण्याचे काम उद्या मंगळवार दिनांक 09/01/2024 रोजी सकाळी 11.00 ते बुधवार दिनांक 10/01/2024 सकाळी 11.00 वाजेपर्यंत सुरू राहणार असल्यामुळे शहरातील काही भागांचा पाणीपुरवठा 24 तास बंद ठेवण्यात आला आहे.

सदर शटडाऊन कालावधीत घोडबंदर रोड आनंदनगर येथील कासारवडवली गाव (काही भाग), एव्हरेस्ट वर्ल्ड संकुल, यशराज पार्क संकुल, होरायज़्न हाईट संकुल, क्रिष्णा ग्रीन लँड पार्क संकुल, विजयपार्क संकुल, राम मंदिर रोड परिसरातील गृहसंकुले, भवानीनगर व ट्रॉफिक पार्क जलकुंभारवरील उन्नती वुड संकुल, ट्रॉपीकल लगुन संकुल विजय विलास संकुल व वाघबीळ जुना गाव व स्वस्तकि रेसीडेन्सी संकुल व हिल स्प्रिंग संकुल सर्व्हिस रोड ते कासारवडवली नाका सर्व्हिस रोड लगतचा परिसर इ. भागांचा पाणीपुरवठा 24 तासासाठी पुर्णपणे बंद राहील. पाणीपुरवठा सुरू झाल्यानंतर पुढील 1 ते 2 दिवस कमी दाबाने पाणीपुरवठा होईल याची कृपया नागरिकांनी नोंद घ्यावी.

सदर पाणी कपातीच्या कालावधीत पाणी काटकसरीने वापरुन ठाणे महानगरपालिकेस सहकार्य करावे असे नागरिकांना आवाहन पालिकेतर्फे करण्यात आले आहे.

# अयोध्येतील राम मंदिराचे उद्‌घाटन म्हणजे मुस्लिमांविरुद्ध 'ऑपरेशन ब्लू स्टार'

## खलिस्तानवादी अतिरेकी गुरपतवंतसिंग पन्नूने ओकली गरळ

**टोरँटोः** खलिस्तानवादी अतिरेकी गुरुपतवंत सिंग पन्नू याने अयोध्येतील राम मंदिराची उभारणी आणि उद्घाटन हे भारत सरकारने मुस्लिमांच्या विरोधात उघडलेले ऑपरेशन ब्लू स्टार असल्याचे सांगत मुस्लिमांना भडकवण्याचा प्रयत्न केला आहे. मुस्लिमांनी भारतातून स्वतंत्र उर्दूस्थान निर्माण करावे, अशी गरळही त्याने ओकली आहे.

परदेशात राहून भारताविरुद्ध कारस्थाने करणाऱ्या सिख फॉर जस्टिस या दहशतवादी संघटनेचा प्रमुख असलेला पन्नू याने एक व्हिडिओ प्रसिद्ध करून राम मंदिर



आणि मोदी सरकारच्या विरोधात मुस्लिमांना भडकवण्याचा प्रयत्न केला आहे.

राम मंदिर उद्घाटन कार्यक्रमाला मुस्लिमांनी विरोध करावा. त्यांनी उद्घाटनाच्या २२ जानेवारी या दिवसापूर्वी अमृतसरपासून अयोध्येपर्यंत सर्व विमानतळे बंद करावी, असे आवाहन पन्नू यांने केले आहे. बाबरी मशीद उध्वस्त करून अयोध्येत राम मंदिर उभारले असल्याचा आरोपही त्याने केला आहे.

पन्नू हा आपल्या संघटनेमार्फत खलिस्तानवादी विचारांचा प्रचार प्रसार करणे, दहशतवादी कारवायांसाठी निधी जमा करणे, तरुणांची माथी भडकावून त्यांना दहशतवादी संघटनेकडे आकृष्ट करणे अशा कारवाया भारताला बाहेर राहून करत असतो. त्याच्याकडे अमेरिका आणि कॅनडा अशा दोन देशांचे नागरिकत्व आहे.

# ... तोवर मराठी नाटक संपणार नाही: देवेंद्र फडणवीस

## शंभराव्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचा हस्तांतरण सोहळा संपन्न

पिंपरी : प्रतिनिधी

प्रेक्षकांच्या निकट जो असतो तोच खरा अभिनेता असतो. पूवी राजकीय नेत्यांना संमेलनात बोलावले की टीका व्हायची पण आता चित्र बदलले आहे. आर्टीफिंशियल इंटीलिजन्स कडे संवेदनशीलता नाही. कितीही आर्टीफिंशियल इंटीलिजन्स आलं तरी संगीत, नाट्य, कला यावर परिणाम होणार नाही. आर्टीफिंशियल इंटीलिजन्स मानवी संवेदना देवू शकणार नाही. मराठी रंगभूमी ही सवोत्तम आहे. ती टिकवावी लागेल. शाश्वत मूल्य लक्षात घेवून २१ व्या शतकातील मूल्य ओळखावी लागतील. ओटीटीच्या काळात देखील नाटक संपलेलले नाही. जोवर मराठी रसिक जिवंत आहे तोवर नाटक संपणार नाही,. असे मत राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले.



शंभराव्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचा हस्तांतर सोहळा रविवारी चिंचवड येथे पार पडला यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार, प्रा. मिलिंद जोशी (कार्याध्यक्ष, महाराष्ट्र साहित्य परिषद), नाट्य संमेलनाचे आयोजक भाऊसाहेब भोईर, १०० व्या नाट्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. जब्बार पटेल, आमदार महेश लांडगे, आमदार उमा खापरे, नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले, पिंपरी चिंचवड महपालिकेचे आयुक्त शेखर सिंह, कैलास कदम, शंकर जगताप, सचिन भोसले, धम्मराज साळवे, तुषार कामटे, सचिन चिखले, निलेश तरस, चेतन बेंद्रे, राजेंद्र मुथा, स्वप्नील कांबळे, चंद्रकांत लोढे, राजेंद्र जैन, नाट्य परिषद पिंपरी चिंचवड शाखेचे कार्याध्यक्ष राजेशकुमार साकला, उपाध्यक्ष कृष्णकुमार गोयल, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी डी पाटील, धारिवाल ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजचे प्रकाश धारिवाल आणि नाट्य परिषद नियमाक मंडळाचे पदाधिकारी आदि मान्यवर उपस्थित होते. या प्रसंगी पिंपरी - चिंचवड शहरातील २५ दिग्गजांचा सत्कार उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

तसेच यावेळी सोलापूर नाट्य परिषदेकडे मान्यवरांच्या हस्ते नटराज आणि घंटा सुपूर्द करण्यात आली.

पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, अण्णासाहेब किर्लोस्कर यांनी नाटकाला केशराचं शेत म्हटले होते, मला वाटते शंभरावे नाट्य संमेलन हे केशराचं उद्यान असावं. केशरी रंग आम्हाला प्रिय आहे. सध्या देशाचा अमृतकाळ सुरू आहे, राज्याचा अमृतकाळ लवकरच सुरू होईल त्या काळात नाट्य क्षेत्र नक्की कुठे असेल याची कल्पना आम्हाला येणार नाही, मात्र तुम्ही नाट्य क्षेत्रातील लोकांनी आम्हाला सांगा नेमके व्हीजन काय असावे? ते पूर्णत्वास नेण्यास आम्ही पूर्ण सहकार्य करू.

सुधीर मुनगंटीवार म्हणाले, नाट्य क्षेत्रात बदल व्हावा, विकास व्हावा हा संकल्प घेऊन आम्ही इथे आलो आहोत. मराठी नाटकांवर आज काहीसे सावट असले तरी ते निश्चित दूर होईल यात शंका नाही. मराठी नाटक फक्त मनोरंजन करत नाही तर जगण्याची दिशा देते. तसेच डॉ. जब्बार पटेल यांनी बिनविरोध कसे निवडून यायचे हे सांगावे मी मंत्रालयातून फाइल्स कशा क्लियर करायच्या याचे गुपित सांगतो, असे सांगत नाट्य क्षेत्राच्या, नाट्य गृहाचे प्रश्न सुटेपर्यंत आम्ही सत्ता सोडणार नाही अशी मिश्किल टिपणी केली.

डॉ. जब्बार पटेल म्हणाले, लहान मुलांमध्ये संवेदनशीलता, आकलन क्षमता जास्त असते त्यांना शाळेत कला विषय ज्ञान देण्याची गरज आहे, कारण आजची बालके मोबाईलच्या आहारी गेलेली आहेत. पुढे जाऊन त्यांना वाद्य, कला याचे ज्ञान मिळेल आणि ते प्रगल्भ होतील. तसेच नाट्य संमेलनात मल्याळम, कन्नड आणि बंगाली रंगभूमी वरील काही कार्यक्रम आणि विदेशातील फ्रेंच व जर्मन रंगभूमीची भारतीयांना ओळख करून द्यावी अशी अपेक्षा डॉ. पटेल यांनी व्यक्त केली.

दरम्यान, राज्यकर्त्याकडून नाट्यक्षेत्राचे प्रश्न सोडविण्यास उशीर होतो, मंत्रालयात फाइल्स पुढे सरकत नाहीत, त्या विलंबित तालात फिरतात त्याला द्रुत लयीत फिरवण्याची गरज असल्याचेही डॉ. पटेल यांनी सांगितले.

सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार, उपमुख्यमंत्री अजित पवार, देवेंद्र फडणवीस हे उत्तम कलाकार, उत्तम नाटक करतात. पण त्यांचे कार्यक्षेत्र जास्त आहे. ते रंगकमी असल्याने आम्ही त्यांना हक्काने काही मागू शकतो, असे म्हणत नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले म्हणाले. नाट्यगृहांचे जे व्यवस्थापक नेमले जातात ते वेगवगेळ्या विभागातून आलेले असतात. त्यांना नक्की तेथे काय काम अपेक्षित आहे हे बहुदा माहीत नसते. त्यामुळे जे जेष्ठ कलाकार आहेत. त्यांना नाट्यगृहांचे उपव्यवस्थापक म्हणून नेमण्यात यावे; तसेच नाट्यगृह बांधताना शासनाच्या समितीत एक जेष्ठ कलाकार असावा, अशी मागणी दामले यांनी प्रशासनाकडे केली.

प्रा. मिलिंद जोशी म्हणाले, आज या समारंभात उपस्थित राहता आल्याचा अतिशय आनंद होत आहे. महाराष्ट्र साहित्य परिषद आणि नाट्य परिषद यांचंही नातं खूप जुने आहे. एकमेकांना पूरक असं काम या दोन संस्था करत आल्या आहेत. पूवी अनेक मान्यवरांनी नाट्य संमेलन आणि साहित्य संमेलनाचेही अध्यक्षपद भूषवलेले आहे. साहित्य संमेलन मराठी समाजाचा साहित्यिक उत्सव आहे. पूवीपासून कला - साहित्य निमितीचे केंद्र पुणे मुंबईत होते मात्र आता ती परिस्थिती राहिलेली नाही. ग्रामीण, दुर्गम आदिवासी भागातील लेखक लिहायला लागलेले आहेत. तेच नाटकाच्या बाबतीतही घडत आहे. काही सन्माननीय अपवाद वगळता राजकीय विचार नाट्यांची परंपरा मराठीत पुरेशी विकसित झालेली नाही. ज्याप्रमाणे मराठी साहित्य विश्व राष्ट्रीय विषयावरील कसदार कादंबरीच्या प्रतिक्षेत आहे त्याच प्रमाणे राजकीय विचारनाट्याच्या प्रतीक्षेत सध्याची मराठी रंगभूमी आहे. राजकारणी मंडळी ही अचंबित होतिल असे कुटील राजकारण सध्याला स्वतःला बुद्धिमान म्हणून घेणारे आणि साहित्यिक म्हणून घेणारे मान्यवर पडद्याआडून करत असतात. कलावंताची कला कशी असावी याचा निर्णय जेव्हा समाजातील झुंडी घ्यायला लागतात तेव्हा ती कलेच्या ऱ्हास पर्वाची सुरुवात असते. या झुंडींचा बंदोबस्त शासनाने करण्याची गरज आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना भाऊसाहेब भोईर म्हणाले, मोरया गोसावींची ही भूमी आहे. २७ वर्ष काम केल्याचे १०० वे नाट्य संमेलन हे फळ आहे. पुणे ही सांस्कृतिक नगरी आहे पण पिंपरीला उप सांस्कृतिक राजधानी मिळावी अशी आमची अपेक्षा आहे. सर्वांच्या मदतीने हे नाट्य संमेलन यशस्वी झाले आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मिलिंद कुलकणी यांनी तर आभार प्रदर्शन नरेश गडेकर यांनी मानले.

ज्येष्ठ कलाकारांच्या वृद्धाश्रमासाठी दिवंगत अभिनेते विक्रम गोखले यांनी अखिल भारतीय नाट्य परिषदेकडे जमीन दिली आहे. त्या जमिनीवर वृद्धाश्रम करावे अशी मागणी परिषदेच्यावतीने सरकारला करण्यात आली. यावर आज बोलताना उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी 'जेष्ठ कलाकारांचा आराखडा तयार करा, शासन त्या उपक्रमांसाठी मदत करेल', असे आश्वासन दिले.

# भारतीय परंपरेतली मुळं..

माझ्या साऱ्या तत्त्वज्ञानाचा सारांश तीन शब्दांत आहे स्वातंत्र्य, समता आणि बंधुता. लोक म्हणतात ही मूल्ये मी फ्रेंच राज्यक्रांतीतून घेतली आहेत. लोक काहीही म्हणोत; मी मात्र ही तत्त्वे माझ्या गुरूकडून, गौतम बुद्धाकडून घेतली आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे हे सुप्रसिद्ध विधान आहे.

याचा अर्थ बाबासाहेब आंबेडकरांचा फ्रेंच राज्यक्रांतीला किंवा पाश्चात्त्य तत्त्वज्ञानातून विचार स्वीकारण्याला विरोध होता, अशातला भाग नव्हे. बाबासाहेब बुद्धाचे बोट पकडून भारतीय परंपरेसोबत असणारी नाळ घट्ट करत होते.

डिस्कव्हरी ऑफ इंडियाह्नसारखा ग्रंथ जेव्हा पं. नेहरू लिहित होते तेव्हा इथली बहुविध परंपरा समजून घेण्याचा तो एक मनोज्ञ प्रयत्न होता. भविष्याचं बांधकाम करण्याच्या दृष्टीने इतिहासाकडं पाहत असताना नेहरूंना तीन बाबी अधिक महत्त्वाच्या वाटल्या : लोकशाहीच्या अधिष्ठानावर आधारलेला समाज, सामाजिक एकोपा, एकतेच्या अखंड सांस्कृतिक सभ्यतेचा प्रवाह. या तिन्ही बाबी ऐतिहासिक परंपरेत शोधण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

महात्मा गांधींनी तर भारतीय परंपरा पूर्णतः आत्मसात केली होती. वैष्णव जन तो तेणे कहिएपासून ते रघुपति राघव राजाराम आवडणाऱ्या गांधींनी भारतीय परंपरेची नस पकडली होती. म्हणूनच तर त्यांच्या आश्रमात सर्व धर्मांची प्रार्थना व्हायची आणि सगळ्या धर्मांची प्रार्थना म्हणत असताना गांधींनी देव, दैव, कर्मकांड या साऱ्याला फाटा दिला होता.

थोडक्यात, स्वातंत्र्य चळवळ आणि संविधान निर्मिती प्रक्रिया यामध्ये अग्रभागी असलेले लोक भारतीय परंपरेचा गंभीरपणे विचार करत होते.

भारतीय संविधान हे जरी वसाहतवादाच्या काळात तयार झालेले असले तरी त्याची पाळंमुळं भारताच्या प्राचीन परंपरेत दिसतात. समतेची मूल्ये बौद्ध परंपरेत दिसतात. बुद्धाचा भिख्खू संघ ही लोकशाही तत्त्वांनुसार चालणारी संस्था होती. गौतम बुद्ध आणि वर्धमान महावीर यांच्या मांडणीतून अहिंसेचे आणि सहभावाचे महत्त्व ध्यानात येते. चार्वाकाने सांगितलेले तत्त्वज्ञान वैज्ञानिक दृष्टिकोनाचे महत्त्व अधोरेखित करते. वैदिक संहितांमध्ये समतेचे मूल्य नसले तरी सभा, समिती यांसारख्या रचना अस्तित्वात होत्या. त्याहून महत्त्वाची म्हणजे बाराव्या शतकात बसवण्णांनी सांगितलेली अनुभवमंटप ही रचना! अनुभवमंटप ही सार्वजनिक मंथनासाठीची जागा होती. त्या काळातील छोटीशी संसद. याचे नियम हे आपल्याला आजही अचंबित करतील असे होते. सर्वजण समान आहेत इथपासून ते आंतरजातीय विवाह आणि आंतरजातीय भोजनास प्राधान्य दिले पाहिजे, इथवर सारे समताधिष्ठित नियम. पुढे सोळाव्या शतकात तर तुकोबा सांगतातः

**विष्णूमय जग। वैष्णवांचा धर्म।।**
**भेदाभेद भ्रम। अमंगळ।।**

भक्ती परंपरेतील मीरा रामाचे आणि कृष्णाचे महात्म्य गातानाच प्रेमाची महती सांगते आणि सुफी परंपरेतला ख्वाजा मोइनुद्दीन चिश्ती सांगतो खुदाच्या दोस्तानं पृथ्वीसारखं उदार असलं पाहिजे आणि कबीर तर बाजाराच्या मधोमध उभा राहून ह्यढाई आखर प्रेम केह्न सांगत सर्वांच्या कल्याणाची मागणी करतो.

रूढार्थाने कुणी याला संविधानाची मुळं आहेत, असं मानणार नाही; पण या सगळ्या परंपरेच्या मुशीतच आपलं सामूहिक मानस घडलं आहे. झाड उंच वाढत जातं; पण त्याची मुळं अशी खोल खोल चहूबाजूंनी पसरलेली असतात.

# घरात एखादी मुलगी असती तर ...

**(भाग ४)**

आबा' आबा, मग आपण त्या राजाला बोलावून घेऊ. त्याच्याकडे काही माहिती असेल . शिवाय त्याचे वडापाव देखील मागावूया. दुसऱ्याच दिवशी राजा करवंदेला आबांनी घरी बोलावले. राजा करवंदे कडून वेगळीच माहिती समोर आली. राजा करवंदेचे पूर्वज जहागीरदारांकडे कामाला होते पण काही कारणास्तव त्यांनी हे काम सोडून दिले. ते कारण खूप दुर्दैवी होते. आबा, राजाने जे काही सांगितले ते कशावरून खरे समजायचे. तो आपल्या घराण्यावर काहीही आरोप करत होता. कौस्तुभ मलाही हे सगळे अनपेक्षित आहे. सुचत नाही काही मला की कावेरीने असा काही शाप दिला होता. आबा आपण कावेरीच्या माहेरी चौकशी केली तर, तसेही राजा कावेरीच्या माहेरचा आहे रेवती रेवती, अग कावेरीच माहेर आपण कसे शोधणार आहोत₹ आबा आबा, परवा आपण वंशावळ लिहली ना त्यात आपल्या घरात येणाऱ्या सुनांच्या नावाखाली त्यांचे माहेरचे आडनाव, गाव आहे. त्यात कावेरीची माहेर आपल्याला सहज सापडेल. देवीचे नवरात्र सुरु झाले. वसूने हौसेने मधुमतीचा भोंडला केला. त्याला सुमतीबाईंचा विरोध होता . वसूने'आग्रहाने सगळ्यांना बोलावले होते. रेवती सुद्धा आली होती.आज आबा मधुमती बद्दल सगळ्यांना सांगणार होते हि गोष्ट फक्त कौस्तुभ आणि रेवतीलाच माहिती होती. आबा, खिरापत घ्या. वसू अग किती आहे खिरापत, थोडी कमी कर आबा असू द्या ना बर. वसू हे सगळे बाहेर आणा. आपण तिथेच बसून बोलूया थोड्या वेळात अंगणात सगळ्याना बोलावण्यात आले. कौस्तुभ आबाशेजारी झोपाळयावर बसला होता. सुमतीबाई उंबऱ्यापाशी बसल्या होत्या. त्यांच्या शेजारीच वासंती, वसू, मधुमती, शर्मिष्ठा -सारंग आणि जयदेव, अनिरुद्ध बसले होते .बोलणयासाठी आबा उभे राहिले.

गेले चार महिने मधुमती आपल्या घरात राहतेय. पण मधुमती नक्की कोण आहे , या प्रश्नाचे उत्तर काही मिळत नव्हते. त्याचे उत्तर असे आहे की मधुमती आपलीच मुलगी आहे. जहागीरदारांची मुलगी आहे. म्हणजे? सुमतीबाई जहागीरदाराच्या घरात जयदेवच्या आधी चौथ्या पिढीत जन्माला आलेली एकमेव मुलगी आहे ती आबा एकमेव मुलगी म्हणजे? जयदेव ₹सांगतो. जयदेवच्या आधीच्या चौथ्या पिढीत कावेरी परशुरामाच्या पोटी एक मुलगी जन्माला आली होती. पण वंशाला दिवा हवा ह्या हट्टापोटी या मुलीला अगदी दोन दिवसाची असताना मारून टाकण्यात आले . या गोष्टीमुळे कावेरी वेडी झाली आणि परशुराम घर सोडून निघून गेला. त्याचा खूप शोध घेण्यात आला पण तो सापडला नाही . वेडाच्या भरात कावेरी बडबडत असायची .

ती पुन्हा जन्म घेणार...ती नक्की येणार आहे....ती माझ्यावर रागावून गेली आहे.

मी आई असून तिला वाचवू शकले नाहीतिला मायेने, प्रेमाने साद घातल्यावरच ती येईल. तोपर्यंत येणार नाही . लक्षात ठेवा. माझा शाप आहे या घरात मुलगी जन्माला येणार नाही. याचा परिणाम असा झाला की मुलीचे कौतुक करण्यावर बंदी झाली . अगदी शेजाऱ्यांच्या मुलीचे कौतुक करण्यावर बंदी आली. कावेरीचं वेडाच्या भरात बड्बडण खरे झाले तर आणि तिची मुलगी पुन्हा ह्या घरात जन्माला आली आर अनर्थ घडेल हि भीती होती. या नियमाचे पालन गेल्या चार पिढ्यानी केले अगदी सुमतीबाईंनी सुद्धा केला. आजही त्या देसायांच्या मुलींना नांवें ठेवतात , पण कौतुक करत नाहीत. पण सुमतीवाहिनी ना या नियमामागे ही दुर्दैवी कथा असेल हे माहिती नव्हते. नेमकी हीच गोष्ट त्या वसूला आई वासंतीला सांगायच्या विसरल्या. त्यामुळे आई वहिनीच्या स्वप्नात यायची. चार महिन्यापूवी जयदेव -वसू आणि वासंती या तिघांनी आपल्या बोलण्यातून तर कौस्तुभने आपल्या लिखाणातून ₹घरात एखादी मुलगी असावी ₹ ही इच्छा व्यक्त केली. त्यामुळे कावेरीच बोलणे खरे ठरले. तिची मुलगी पुन्हा आली ते मुलीचे सुख द्यायला. ती मुलगी म्हणजे आपली मधुमती. या तुळशी वृंदावनाला पडली होती. त्याचे कारण म्हणजे कावेरीची इच्छा पूर्ण झाली. तिची मुलगी वृंदावनातून बाहेर पडली होती. खरे सांगायचे तर कौस्तुभने लिहलेली कथा म्हणजे या सर्व गोष्टींचा पूर्वसंकेतच म्हणायचं. हरकत नाही पण आपल्यला ही गोष्ट उशिरा समजली. आणखी एक गोष्ट म्हणजे पूवी आपण आकाशकंदील लावायचो . पण कावेरीला वेड लागल्यानंतर ती आकशकंदील तोडून टाकायची . कावेरीच्या मृत्यनंतरही आकाशकंदील आपोआप तुटायचा . तो कावेरीच्या तिच्या मुलीसाठी आक्रोश असायचा . पुढे दार दिवाळीत हा प्रकार घडू लागला. शेवटी आकाशकंदील लावणे बंद झाले. पणत्याही विझू लागल्या.

पण ह्या सगळ्या गोष्टी तुला कशा समजल्या कि आधीच्या पिढीत असे काही घडले आहे ते जयदेव ₹या सगळ्या गोष्टीचा उलगडा करताना मला कौस्तुभ आणि रेवतीची खूप मदत झाली. परवा कौस्तुभकडून आपली वंशावळ पुन्हा लिहून घेतली. त्यानंतर सुमतीवहिनींनी मला मधुमती बद्दल सगळे काही सांगितले . शिवाय त्यांच्या स्वप्नाबद्दलही सांगितले. मग आठवले आपल्या घरात काही जुने दागिने आहेत. ते दागिने आईने कधीच वापरले नाहीत. आई म्हणायची की हे दागिने शापित आहेत कावेरीसारखे. जेव्हा जेव्हा दागिन्यांचा विषय निघायचा.पण कावेरी कोण हे आईने कधी सांगितले नाही.

मग कावेरी कोण याचा शोध वंशावळीत सापडला . कावेरी हि जहागीरदारांची सून आणि गणेशपंत वेळवंडीकर यांची मुलगी. गणेशपंत वेळवंडीकर हे वेळवंडीचे संस्थानिक होते. गडगंज श्रीमंती. गणेशपंतांनी त्याकाळात परशुरामला शिक्षणासाठी परदेशी पाठवले. शिवाय जहागीरदारांच्या घरी भरपूर सोनेनाणे मौल्यवान वस्तू , रेशमी वस्त्रे पाठवली . लग्नात कावेरीला भरपूर दागिने दिले . कावेरीसोबत दोन नोकर माणसे पाठवली करवंदे नावाची.

....(क्रमशः)

**सौ. प्राजक्ता प्रणव देव**
**पिरंगुट, पुणे.मो.- ८७६६५८३९२**

# वेल्हे तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा उत्साहात संपन्न

## लोकनृत्यात पाबे व रुळे शाळा प्रथम ; प्रश्नमंजुषेमध्ये पाबे व पानशेत शाळेची बाजी





**- स्वाती कोळी -**

**वेल्हे :** यशवंतराव चव्हाण कला, क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव अंतर्गत वेल्हे तालुकास्तरीय स्पर्धा बुधवारी (ता.३) दापोडे (ता. वेल्हे) येथील तानाजी मालुसरे माध्यमिक विद्यालयाच्या प्रांगणात उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेमध्ये वेल्हे तालुक्यातील ५५० विद्याथी सहभागी झाले होते.

या स्पर्धेचे उदघाटन वेल्ह्याचे गटशिक्षणाधिकारी चंद्रकांत उगले यांच्या हस्ते करण्यात आले. माजी जिल्हा परिषद सदस्य अमोल नलावडे यांच्या हस्ते विजेत्या स्पधर्कांना सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्रक देऊन गौरवण्यात आले. स्पर्धेचे यशस्वी संयोजन शिक्षण विस्तार अधिकारी दीपक नलावडे व दापोडे केंद्राचे केंद्रप्रमुख प्रवीण इंदलकर यांनी केले. यावेळी पानशेतच्या शिक्षण विस्तार अधिकारी राजश्री गावडे, करंजावणे बीटाचे शिक्षण विस्तार अधिकारी शकील मुल्ला, दापोडे हायस्कूलचे प्राचार्य बाजीराव पवार, विषयसाधन व्यक्ती इंद्रायणी गायकवाड, विषयतज्ज्ञ शोभा चौधरी, दशिर्ले, बाळासाहेब शेख, केंद्रीय मुख्याध्यापिका संगीता आधवडे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष गणपत रेणुसे, तालुक्यातील केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक व शिक्षक उपस्थित होते.

संपत आधवडे व सुरेश कोळी यांनी सूत्रसंचालन केले तर आभार पुरुषोत्तम कुलकणी यांनी मानले.

सांघिक स्पर्धेतील प्रथम क्रमांक प्राप्त विजेते संघ पुढीलप्रमाणे : लोकनृत्य स्पर्धा : (लहान गट ) पाबे शाळा, (मोठा गट ) रुळे शाळा. प्रश्नमंजुषा स्पर्धा : (लहान गट ) पानशेत शाळा, (मोठा गट ) पाबे शाळा. भजन स्पर्धा : (लहान गट ) करंजावणे शाळा, (मोठा गट ) सोंडे सरपाले शाळा. कबड्डी स्पर्धा : (लहान गट मुले) रांजणे शाळा, (लहान गट मुली) सुरवड शाळा, (मोठा गट मुले) रुळे शाळा, (मोठा गट मुली) गुंजवणे शाळा. खोखो स्पर्धा : (लहान गट मुले) अंत्रोली शाळा, (लहान गट मुली) अंत्रोली शाळा, (मोठा गट मुले) केळद शाळा, (मोठा गट मुली) केळद शाळा. लेझीम स्पर्धा : (लहान गट मुले) वांजळे शाळा, (लहानगट मुली) खाटपेवाडी शाळा, (मोठा गट मुले) रुळे शाळा, (मोठा गट मुली) अडवली शाळा.

वैयक्तिक स्पर्धेतील प्रथम क्रमांक प्राप्त खेळाडू (कंसात शाळा) पुढीलप्रमाणे : वक्तृत्व स्पर्धा : लहान गट - शुभ्रा सुनील चौगले (मेरावणे), मोठा गट - तन्वी नथुराम रेणुसे (पाबे). थाळी फेक स्पर्धा : मोठा गट मुले - आर्यन अनिल रेणुसे (पाबे), मोठा गट मुली - अक्षरा शंकर भिलारे (मांगदरी). गोळा फेक स्पर्धा : कौशल्य केळतकर (पानशेत), मोठा गट मुली - अक्षरा शंकर भिलारे (मांगदरी). धावणे स्पर्धा : ५० मी. लहान गट मुले - हर्षल नामदेव कदम (रांजणे), लहान गट मुली - जेसिका वसंत वाघमारे (पानशेत), १०० मी. मोठा गट मुले - रमेश श्रावण कोळी (पानशेत), मोठा गट मुली - आदिती पांडुरंग कदम (निगडे मोसे). उंच उडी स्पर्धा : लहान गट मुले - प्रथमेश चंद्रहास दारवटकर (रांजणे), लहान गट मुली - हषर्दा नवनाथ दारवटकर (रांजणे), मोठा गट मुले - कार्तिक मारुती शेजवळ (रुळे), मोठा गट मुली - साक्षी राजू खुळे (देवपाल). लांब उडी स्पर्धा : लहान गट मुले - प्रथमेश चंद्रहास दारवटकर (रांजणे), लहान गट मुली - गौरी ठाकर (अंत्रोली), मोठा गट मुले - आदित्य किसन काटकर (अडवली), मोठा गट मुली - साक्षी राजू खुळे (देवपाल).

*वेल्हे तालुक्याचे कार्यक्षम गटशिक्षणाधिकारी चंद्रकांत उगले यांच्या मार्गदर्शन व नेतृत्वाखाली आणि शिक्षण विस्तार अधिकारी दीपक नलावडे यांच्या संयोजनातून वेल्हे तालुक्याच्या इतिहासात प्रथमच तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त सर्वाधिक 108 खेळाडूंना सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्रक देऊन गौरविण्यात आले.*

*वेल्हे तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत सहभागी खेळाडू, मार्गदर्शक शिक्षक व त्यांच्यासोबत आलेल्या पालकांसाठी माजी जिल्हा परिषद सदस्य अमोल नलावडे यांच्या वतीने नाश्ता व सुरुची स्नेहभोजनाची व्यवस्था करण्यात आली होती.*

# भगवंताच्या आकलनाचा 'नाम' मार्ग

**योग, ज्ञान, याग हे सर्व मार्ग भगवंताकडे जाणारे अवघड घाट आहेत. मात्र आमच्या साधुसंतांनी या अवघड वाटा मोडून नामजपाचा राजमार्ग भाविकांसाठी खुला करून दिला. भगवंतांचे नाव हे सोपे आणि सहजसाध्य होणारे आहे. मात्र ते मनोभावे, सद्गदित अंत:करणाने घेतले पाहिजे.**



एकतत्त्व

**नाम दृढ धरी मना।**
**हरीशी करुणा येईल तुझी॥१॥**
**ते नाम सोपे रे रामकृष्ण गोविंद।**
**वाचेशी सद्गद जपे आधी॥२॥**
**नामापरते तत्त्व नाही रे अन्यथा।**
**वाया आणिक पंथा जाशी झणी॥३॥**
**ज्ञानदेवा मौन जपमाळ अंतरी।**
**धरोनी श्रीहरी जपे सदा॥४॥**

भगवंताला आपलेसे करण्यासाठी नाना प्रकारची साधने असली तरी त्यात त्याचे नाम हेच एकमेव तत्त्व आहे. इतर साधनांच्या माध्यमांद्वारे भगवंताचे आकलन करण्याचा प्रयत्न म्हणजे एकटयाने अवघड कडा चढण्यासारखे आहे. अगदी योगाचेच उदाहरण द्यायचे झाले तर योग किती अवघड आहे. श्वासनिरोधन करून शरीरातील तापमान तप्त करायचे आणि कुंडलिनी जागृत करायची. नाभीच्या खाली असलेली ही कुंडलिनी जागृत झाल्यानंतर हळूहळू ब्रह्मरंध्राच्या दिशेने जाते. मात्र त्यात श्वासनिरोधनाचे सूत्र फसले तर त्यात जिवाला धोकाही होऊ शकतो. त्या वेळी सावरण्यासाठी कोणीच पुढे येत नाही. ज्याप्रमाणे कडयावरून एकटयाने जाण्याचा प्रयत्न करणे म्हणजे स्वतःच्या आत्मघाताला कारणीभूत होण्यासारखे आहे. तसेच योगाच्या माध्यमातून भगवंताकडे जाण्यासारखे आहे. ज्ञानेश्वर महाराज गीतेवरील आपल्या टीकेमध्येसुद्धा योगाच्या माध्यमातून भगवंताला आकलन करण्याचे प्रयत्न करणे म्हणजे दुःख ओढवून घेण्यासारखे आहे, असे सांगतात. महाराज म्हणतात-

**योगाचिया वाटा। जे गेले गा शुभटा।**
**तया दु:खाचाची वाटा। भागा आला॥**

योग, ज्ञान, याग हे सर्व मार्ग भगवंताकडे जाणारे अवघड घाट आहेत. मात्र आमच्या साधुसंतांनी या अवघड वाटा मोडून नामजपाचा राजमार्ग भाविकांसाठी खुला करून दिला. हे सांगताना तुकाराम महाराज म्हणतात-

**मोडोनिया वाटा सूक्ष्मदुस्तर।**
**केला राज्यभार चाले ऐसा॥**

अवघड साधने टाकून नामस्मरणाचे सुलभ साधन साधुसंतांनी आम्हाला दाखवून दिले. संसारिक दुःखाने भयभीत झालेल्या जीवांना दिलासा देताना ज्ञानदेव म्हणतात, इतर साधनांची खटापट न करता भगवंताचे नामच एकतत्त्व आहे, असे समजून मनामध्ये दृढ धर. या ठिकाणी दृढ हा शब्द फार महत्त्वाचा आहे. कोणत्याही कार्यासाठी दृढ निश्चय असेल तरच ते कार्य साध्य होते. म्हणून या नामाला मनामध्ये दृढ धरायला सांगतात. कारण केवळ वाचेने केलेला उच्चार वरपांगी ठरू शकतो. जोपर्यंत मनापासून भगवंतांचे नाव घेतले जाणार नाही, तोपर्यंत त्याला (भगवंताला) आपली करुणा येणार नाही.

भगवंतापर्यंत पोहोचण्यासाठी अगोदर सांगितल्याप्रमाणे इतर साधने आहेत, परंतु ते अवघड आहे. इथे मात्र महाराज सांगतात, ज्या नामाच्या माध्यमातून तुला हरीची करुणा येणार आहे, असे अत्यंत सोपे नाम म्हणजे 'रामकृष्ण गोविंद'..! काही साधने सोपी असून फलद्रुप मात्र नसतात. काही साधने फलद्रुप असतात मात्र सोपी नसतात तर काही साधने सोपी आणि फलद्रुप दोन्हीही होणारी असतात.

भगवंतांचे नाव हे असे सोपे आणि सहजसाध्य होणारे आहे. मात्र ते मनोभावे, सद्गतीत अंतःकरणाने घेतले पाहिजे. नाम सोडून इतर मार्गाने भगवंतापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करणे म्हणजे व्यर्थ त्रास करून घेण्यासारखे आहे. म्हणूनच ज्ञानेश्वर महाराज सांगतात, मी त्या भगवंतांची जपमाळ मौनानेच अंतःकरणात धरून त्याचे चिंतन करीत आहे. आपणही त्याचे तसेच चिंतन केल्यास त्या करुणाघन परमात्म्याला तुमची करुणा आल्याशिवाय राहणार नाही.

# बड्या-बड्या कंपन्यांना मागे टाकलं ह्या स्मार्टफोन्सनी; ३५ हजारांच्या बजेटमध्ये लाखमोलाचे फिचर

**स्मार्टफोन बाजारात सध्या जर सुवर्णमध्य कुठे आहे तर तो आहे २० ते ३५ हजारांच्या बजेटमध्ये. हे बजेट त्यांच्यासाठी अतिशय योग्य आहे ज्यांना फ्लॅगशिप स्मार्टफोन फील हवा आणि किंमतही जास्त द्यायची नाही. यंदा कंपन्यांनी काही जुन्या फ्लॅगशिप प्रोसेसरसह काही हॅंडसेट ह्या सेगमेंटमध्ये सादर केले आहेत. तर काही कंपन्यांनी प्रीमियम डिजाइन दिली आहे. चला पाहूया यंदा ३५ हजारांच्या आत लॉंच झालेले बेस्ट फोन्स.**

### पोको एफ५

२६,९९९ रुपयांमध्ये आलेला हा फोन कमी किंमतीत जबरदस्त स्पेसिफिकेशन्स देतो. फोनमध्ये स्नॅपड्रॅगन ७ प्लस जेन २ चिपसेट देण्यात आला आहे. सोबत १२जीबी पर्यंत रॅमसह २५६जीबी पर्यंतची स्टोरेज देण्यात आली आहे. १२० हर्ट्झ रिफ्रेश रेटसह ह्यात गोरिल्ला ग्लास ५ च्या सुरक्षेसह ६.६७ इंचाचा ॲमोलेड डिस्प्ले देण्यात आला आहे. ५जी सपोर्ट असणाऱ्या ह्या फोनमध्ये ५०००एमएएचची बॅटरी देण्यात आली आहे. फिंगरप्रिंट सेन्सर आणि आयपी५३ रेटिंग असलेल्या ह्या हॅंडसेटमध्ये ट्रिपल रियर कॅमेरा सेटअप देण्यात आला आहे. ज्यात ६४एमपी + ८एमपी + २एमपी कॅमेरा आहे. तर फ्रंटला १६एमपीचा कॅमेरा मिळतो.

### आइकू निओ ७ प्रो

आइकू निओ ७ प्रो च्या बेस मॉडेलची किंमत ३२,९९९ रुपये ठेवण्यात आली आहे. स्नॅपड्रॅगन ८ प्लस जेन १ ह्या जुन्या फ्लॅगशिप चिपसेटसह फोनमध्ये १२जीबी रॅमसह २५६जीबी स्टोरेज देण्यात आली आहे. डिव्हाइस १२०हर्ट्झ रिफ्रेश रेट असलेल्या ६.७८ इंचाच्या ॲमोलेड डिस्प्लेसह बाजारात आला आहे. कनेक्टिव्हिटीसाठी ५जी



तर सिक्योरिटीसाठी फिंगरप्रिंट सेन्सर मिळतो. ह्यातील ट्रिपल कॅमेरा सेटअपमध्ये ५०एमपी + ८एमपी + २एमपी सेन्सर आहेत. तर फ्रंटला १६एमपीचा कॅमेरा आहे. पावर बॅकअपसाठी ५०००एमएएचची बॅटरी देण्यात आली आहे.

### सैमसंग गैलेक्सी ए५४ ५जी

कंपनीच्या फ्लॅगशिप सीरिजची झलक ह्या मिडरेंज स्मार्टफोनमध्ये पाहायला मिळते. ३४,९९९ रुपयांचा हा फोन सैमसंग एक्सीनोस १३८० चिपसेटवर चालतो. फोनच्या टॉप मॉडेलमध्ये ८जीबी रॅमसह २५६जीबी स्टोरेज देण्यात आली आहे. हा ५जी फोन गोरिल्ला ग्लास ५, आयपी६७ रेटिंग आणि फिंगरप्रिंट सेन्सरसह बाजारात आला आहे. ३२एमपीच्या सेल्फी कॅमेऱ्यासह ह्यात ट्रिपल रियर कॅमेरा सेटअप आहे. ज्यात ५०एमपी + १२एमपी + ५एमपी चा सेन्सर मिळतो. फोनमध्ये ५०००एमएएचची बॅटरी देण्यात आली आहे. डिव्हाइस ६.४ इंचाच्या ॲमोलेड डिस्प्लेसह आला आहे, जो १२०हर्ट्झ रिफ्रेश रेटवर चालतो.

### वनप्लस नॉर्ड 3 ५जी

वनप्लसच्या नॉर्ड लाइनअपमधील हा सर्वात शक्तिशाली फोन आहे. ३०,३७७ रुपयांपासून ह्याची किंमत सुरु होते तर टॉप मॉडेलमध्ये १२ जीबी रॅमसह २५६जीबी स्टोरेज आहे.




डिव्हाइस मीडिया टेक डीमेंसिटी ९००० चिपसेटवर चालतो. हा ५००० एमएएचची बॅटरी असलेला फोन ५जी कनेक्टिव्हिटीसह येतो. फिंगरप्रिंट सेन्सरसह ह्यात आयपी५४ रेटिंग मिळते. तसेच १२० हर्ट्झ रिफ्रेश रेटसह कंपनीनं ह्यात ६.७४ इंचाचा सुपर फ्लुइड ॲमोलेड डिस्प्ले दिला आहे. फोटोग्राफीसाठी ट्रिपल कॅमेरा सेटअप देण्यात आला आहे. ज्यात ५०एमपीचा मुख्य कॅमेरा, सोबत ८एमपीचा सेकंडरी सेन्सर आणि २एमपीचा थर्ड सेन्सर मिळतो. सेल्फी आणि व्हिडीओ कॉलिंगसाठी १६एमपीचा कॅमेरा मिळतो.



### मोटोरोला एडग ४०

२६,४९९ रुपयांमध्ये फोनचा एकमेव मॉडेल ८जीबी रॅम व २५६जीबी स्टोरेजसह आला आहे. फोनमध्ये मीडियाटेक डीमेंसिटी ८०२० चिपसेट देण्यात आला आहे. १४४ हर्ट्झ रिफ्रेश रेटसह ह्यात ६.५५ इंचाचा पी-ओएलईडी डिस्प्ले देण्यात आला आहे. ४जी सपोर्ट असणाऱ्या ह्या फोनमध्ये ४४००एमएएचची बॅटरी देण्यात आली आहे. फिंगरप्रिंट सेन्सर आणि आयपी६८ रेटिंग असलेल्या ह्या हॅंडसेटमध्ये ड्युअल रियर कॅमेरा सेटअप देण्यात आला आहे. ज्यात ५०एमपी + १३एमपी कॅमेरा आहे. तर फ्रंटला ३२एमपीचा कॅमेरा मिळतो.